शनिवार । २९ डिसेंबर १९७९ । ७५ पैसे

# माणूस



दुर्गाबाई

## गोवा ते गोंदिया

## जनता विजयासाठी अखंड संचार....

**याशिवाय....**

- मुस्लिम मतांचा ऊहापोह
- दिल्ली दिनांक

# सप्रेम नमस्कार

□ 'माणूस'च्या पंधरा डिसेंबर एकोणीससे एकोणऐंशीच्या अंकात 'संध्याकाळचे पुणे' या सदरात श्री. दि. बा मोकाशी यांनी श्री ना. ग. गोरे यांच्याबद्दलच्या आपल्या भावना उत्तम रीतीने व्यक्त केलेल्या आहेत. 'लेखक नानासाहेब महाराष्ट्रातून निवडून येऊन दिल्लीला मंत्रिमंडळात जाऊन बसतील व माझी असूया राहणार नाही...' असे त्यानी म्हटले आहे. त्याच्या विचारांशी महाराष्ट्रातील प्रत्येक सुबुद्ध माणूस सहमत झाल्याशिवाय राहणार नाही. पुण्याहून गेल्या पंचवीस-तीस वर्षांत जे पुढारी लोकसभेवर निवडून गेले व मंत्री झाले त्यामध्ये श्री. काकासाहेब गाडगीळ यांच्याशिवाय दुसरा कोणीही लेखक नव्हता. मंत्रिमंडळात किंवा एकंदर राजकारभारात हाडाचा लेखक मोक्याच्या जागी असला तर आजच्या इतका गोंधळ आणि अनास्था माजणार नाही. पंडित नेहरू हेही एक संवेदनाशील लेखक होते. त्यामुळेच त्याची दृष्टी इतकी उदार राहिली. आजच्या राजकारणात लेखकाला मुळीच स्थान नाही. त्यामुळेच ते इतके रखरखीत आणि भकास झाले आहे.

श्री. गोरे हे मूलतः लेखक असले तरी त्यानी शब्दसृष्टीचे ईश्वर होण्यासाठी ती शक्ती वापरली नाही. उलट स्वतःला राजकारणात आणि हालअपेष्टात झोकूनच दिले. श्री. गोरे हे नुसतेच लेखक राहिले असते तर कदाचित् सकस साहित्य निर्माण झाले असते, परंतु महाराष्ट्राच्या राजकारणात फार मोठी पोकळी अवतरली असती.

आजच्या साहित्यिकाच्या नाकर्तेपणाबद्दल गोरे नेहमीच कठोर टीका करीत आले आहेत. अनेक वर्षांपूर्वी आमचे एक कथा लेखक मंडळ होते. तिथे एकदोनदाच गोरे आले होते. तेव्हा ते म्हणाले होते, 'परवाच मी मुबईस तरुण साहित्यिकाच्या एक बैठकीस हजर होतो. ती सर्व मंडळी फारच सुखलोलुप आणि बोलण्यामध्ये वाष्कळ व बेजबाबदार वाटली. हेच जर आजचे प्रथितयश साहित्यिक असले तर मराठी साहित्याबद्दल कुणालाही चिंताच वाटायला हवी.'... ते गोवा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष निवडले गेले, तेव्हा साहित्य परिषदेत त्यांचा सत्कार झाला. त्या वेळी गोवा पोर्तुगीजाच्या गुलामगिरीत होता. नानासाहेबानी भाषणात सांगितले, 'गोवा साहित्य संमेलनाचा मी नामधारी अध्यक्ष राहणार नाही. मी स्वतः गोव्यात जाऊन त्या प्रदेशाच्या मुक्तीसाठी चळवळ करीन. नुसतेच बोलणे मला परवडत नाही'—त्यांनी आपले बोलणे पुढे खरे केले. गोव्यात जाऊन सत्याग्रह केला आणि घरामध्ये ऐंशी वर्षांचे वडील आणि रुग्ण पत्नी असतानाही जन्मठेपेची शिक्षा स्वीकारली. अशा तऱ्हेच्या क्रियावान साहित्यिकाची उदाहरणे पाच-सात तरी निघतील किंवा नाही याची शंकाच आहे.

श्री. नानासाहेब याची आणि माझी विशेष वैयक्तिक ओळख नसली तरी मी त्यांचे राजकीय कार्य पस्तीस सालापासून पहात आहे. त्यावेळी त्याच्या मालकीचे घर होते म्हणूनच आम्ही त्याना श्रीमत समजत असू. आमच्या त्या वेळच्या श्रीमंतीच्या व्याख्या आज आठवल्या म्हणजे स्वतःचीच कीव वाटते. नानासाहेबाचे वडील साधे कारकून होते. निवृत्तीनंतरही ते काम करीत. इतकी गरीबी असूनही नानासाहेबांनी स्वत च्या वागणुकीतला झोक आणि डौल कधीही सोडला नाही. त्याच्या अंगावर मी कधीही मलिन वस्त्रे पाहिली नाहीत. स्वत च्या जीवनावर त्यांनी इतर कार्यकर्त्याप्रमाणे त्यागीपणाची अवकळा आणली नाही.

असा हा एक साधासुधा मध्यमवर्गीय इग्लडचा राजदूत म्हणून नियुक्त झाला तेव्हाही त्याने स्वत ची ऐट सोडली नाही किंवा उच्च पदाच्या गर्वाचे ओझेही खाद्यावर घेतले नाही.

जनता पक्षामध्ये फाटाफूट झाल्यानंतर ते धावत दिल्लीला आले आणि एकंदर परिस्थिती पाहून कोणत्याही तऱ्हेचा गाजावाजा व जाहिरात न करता राजदूतपदाचे त्यागपत्र त्यानी अगदी सहजगत्या दिले. अंगावरचे झुरळ झटकून टाकावे तितक्या सहजतेने त्यानी ते पद सोडले आजच्या


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : एकतिसावा
२९ डिसेंबर १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

जमान्यात ही एक विशेष गोष्ट आहे असे मला वाटते...जिल्हा परिषदेचे अध्यक्ष-पदही आज कोणी इतक्या सहजतेने सोडणार नाही.

'दुहेरी निष्ठेच्या बाबतीत अनेकांनी जो अवास्तव गदारोळ केला त्यालाही नानासाहेबांनी दाद दिली नाही. शाही इमामशी वाटाघाटी करून वारेमाप जागा कबूल करणारे निधर्मी राज्यकर्ते जनसंघाचा निष्कारण बागुलबुवा उभा करीत आहेत हे त्यांनी बरोबर ओळखले. वास्तविक पाहता गोरे संघाचे किंवा हिंदू तत्त्वज्ञानाचे कट्टर विरोधक आहेत. परंतु त्यानी विचारान्ती जनसंघावरील आरोपात काहीही तथ्य नाही हे ओळखले व प्रतिपक्षाचा डाव उधळून लावला. नानासाहेबांनी आपले वजन तथा-कथित दुहेरी निष्ठेच्या विरोधकाच्या बाजूने टाकले असते तर अनावस्था प्रसंग ओढावला असता.

नानासाहेब म्हणजे तीस सालापासूनच्या चळवळीचा इतिहासच आहे. त्याना निवडून द्यायलाच हवे.

तुम्ही 'माणूस' मधून योग्य उमेदवाराचा प्रचार चालवला आहे त्याबद्दल अभिनंदन !

**श्री. ज. जोशी**
पुणे

---

## लोकशाही बळकट करणे हेच आजचे कर्तव्य.

---

▫ या मध्यावधी निवडणुकीने भारताच्या मतदारांपुढे, उमेदवारांपुढे आणि तसेच निरनिराळ्या राजकीय पक्षांपुढे एक मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे. आजवर झालेल्या निवडणुकात (एक सोडून) असा प्रश्न कधीही निर्माण झालेला नव्हता. हा प्रश्न म्हणजे या निवडणुकीत कुठलाही एक पक्ष केंद्रात मंत्रिमंडळ बनवू शकत नाही. ही गोष्ट प्रत्येक पक्षाच्या पुढे आता स्पष्ट झालेली आहे. आज अखिल भारतीय पातळीवर कुठलाही एक पक्ष भक्कम नाही. ही लोकशाहीची शोकांतिका आहे, तसेच भारतीय जनतेचे दुर्दैव आहे.

कुठल्याही एका राजकीय विचाराने बांधला गेलेला, एका विशिष्ट निष्ठेच्या पोटी जन्माला आलेला आणि भारतासारख्या मोठ्या राष्ट्राचे दूरदृष्टीने नेतृत्व करणारा राजकीय पक्ष आज अस्तित्वात नाही. एका विचाराने प्रेरित झालेले, एका निष्ठेशी बांधले गेलेले आणि कुठल्याही कार्यक्रमाला एकसंधपणे हात घालू शकणारे एका जिवाचे लोक आज कुठल्याही एका पक्षात नाहीत

आजवर भारताचे नेतृत्व एका कॉंग्रेस पक्षाने केले. त्यात त्यांच्या हातून चुका झाल्या नाहीत असे नाही. राजकीय आणि वैय्यक्तिक स्वार्थाच्या आहारी जाऊन त्यांनीही लोकशाही विचारसरणीला अनेक वेळा काळिमा फासलेला आहे अनेक वर्षे एकाच पक्षाच्या हातात सत्ता राहिली असल्यामुळे लोकशाही आचरण जाऊन तिथे एकाधिकारशाहीच्या मनोवृत्ती निर्माण झाल्या. कॉंग्रेस पक्षाला इतिहासाने मिळालेल्या मोठेपणाचा विसर पडून ही जणू आपल्याच कर्तबगारीची किमया आहे असा त्या पक्षामधील नेत्यांना भ्रम झाला आणि त्यांच्या मनोवृत्ती उद्दाम झाल्या. तसेच दुसरा कोणताही विरोधी पक्ष पुरेसा तुल्यबल नसल्यामुळे राजकीय अंकुश राहिला नाही लोकसभा एकाच राज्यकर्त्या पक्षाच्या आधिपत्याखाली आली. त्यामुळे आपल्याला कोणी जाब विचारणारा राहिला नाही या आत्मविश्वासापोटी एकाधिकारशाहीची भावना प्रबळ होत गेली आणि त्याचे परिणाम काय झाले याचा इतिहास अगदी ताजा आहे

ही परिस्थिती कॉंग्रेस पक्ष तुल्यबल होता, अखिल भारतीय पातळीवर एकसंध होता, एकाच राजकीय निष्ठेने प्रेरित झालेला होता, लोकशाही समाजवादाचे ब्रीद सांगणारा होता, तरीही त्याचे रूप पाहता पाहता पालटले आणि तो स्वार्थ आणि सत्तापिपासू वृत्तीच्या आहारी गेला. यावरून एकच गोष्ट दिसून आली की कुठलाही एक राजकीय पक्ष, तो कितीही भक्कम आणि एकसंध असला तरी लोकशाही निष्ठेची जोपासना करू शकत नाही त्यासाठी तेवढाच तुल्यबल दुसरा पक्ष कायम विरोधात असणे आवश्यक आहे आणि अशी गोष्ट आज दृष्टीपथात नाही. ही गोष्ट लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी आहे.

आज इंदिरा गांधी म्हणत आहेत की, देशाला मी व माझा पक्षच स्थिर सरकार देऊ शकेल. ही केवढी मोठी फसवणूक आहे हे वरील विवेचनावरून सहज लक्षात येईल. काही काळ स्थिर सरकार एखादा हुकुमशहाही देऊ शकतो. गेली अकरा वर्षे इंदिरा गांधींचेही स्थिर सरकार होतेच. त्यात लोकसभेत त्यांना प्राप्त झालेल्या सत्तेचा कसा दुरुपयोग केला ही गोष्ट सर्वज्ञातच आहे. आजही त्यांच्या स्वतःच्या आणि त्यांच्या पक्षाच्या घोषणा आपण पाहिल्या तर त्यात लोकशाही मनोवृत्तीचा आणि ब्रीदाचा मागमूसही दिसत नाही. म्हणून या निमित्ताने आपल्यासमोर आज स्थिर सरकार का लोकशाहीची जोपासना करणारे सरकार ? असा प्रश्न उभा राहिलेला आहे.

आज दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, कोणताही एक पक्ष केंद्रात मंत्रिमंडळ बनवू शकत नाही. त्यामुळे मतदारांपुढे कोणत्या पक्षाला मत द्यावे हा प्रश्न पडलेला आहे. प्रत्येक पक्ष लोकशाहीच्या आणाभाका घेऊन आपल्या पुढे उभा आहे. परंतु गेल्या तीस वर्षानंतर तरी खरी लोकशाही काय आहे याची मतदारांना जाणीव झालेली आहे. एवीतेवी संमिश्र मंत्रिमंडळ तर येणारच तर मग आजच्या मतदारानी कुठल्याही एका पक्षाकडे न पाहता उभ्या असलेल्या व्यक्तीची खरी मनोमन पारख करावी. ज्या व्यक्ती लोकशाहीची जोपासना करू शकतील, ज्यांच्यामध्ये सचोटी आणि प्रामाणिकपणा आहे अशाच व्यक्तीना लोकसभेत पाठविणे हेच आजचे कर्तव्य आहे. मग जरी संमिश्र मंत्रिमंडळ आले तरी ते लोकशाही प्रवृत्तीचेच असेल एवढी तरी आपल्याला खात्री देता येईल !

२२ डिसेंबर **वि. शं. पारगावकर**
पुणे

# निवडणुका, सद्यःस्थिती आणि आपले विचारवंत-साहित्यिक

मुलाखती । शब्दांकन : सतीश कामत

## या निवडणुकीत खऱ्या अर्थाने होकारात्मक मतदान होणार आहे....

### —दुर्गा भागवत

'साहित्यिक विचारवंतानी देशातील महत्त्वाच्या राजकीय-सामाजिक घडामोडीमध्ये भाग घेतला पाहिजे. पण तसं करत असताना 'आमच्या परीने जमेल तसं करू' हे म्हणणे योग्य नाही. साहित्यिक विचारवंताचा सहभाग त्याला किती सोसावं लागल, यावरून ठरवलं पाहिजे. समाजातील रेटा या वर्गाने अंगावर घेऊन काम केलं पाहिजे. आमचे साहित्यिक निरनिराळ्या कमिट्यांवर जातात आणि मग ती पदं सोडायची त्यांची तयारी नसते. त्या ठिकाणी ते राजे बनतात व हुकमत गाजवायला लागतात. अशा तऱ्हेच्या कमिट्यांमुळेही लोकशाहीला धोका निर्माण होतो, हे लक्षात आल्यावर आम्ही त्या कमिट्यापासून दूर झालो. दर तीन वर्षांनी कमिट्याची संपूर्णपणे फेररचना करण्यात यावी अशी मागणीही केली; पण ती कुणाला रुचली नाही. यातूनच आम्ही गटबाजीचं राजकारण करायला लागतो. आणि लहान लहान आणीबाण्याही निर्माण करतो.

'मी माझ्या आणीबाणीतील भूमिकेवर स्वत: काहीही लिहिलेलं किंवा बोलले नाही. कारण मला असं वाटतं की इतरानी मला कॅप्टन केलं आणि मी कॅप्टनसारखी वागले. मी माझं कर्तव्य कर्तव्य केलं, कोणावरही उपकार केले नाहीत. आता मला साहित्यिक-विचारवंत मोठेपणा देतात. कारण त्यांचं मन त्याना खातंय. अर्थात आणीबाणी संपल्यावरही मी स्वस्थ बसले नाही. जनता पक्षाच्या चुकीसाठीही मीच त्याना झोडलं. आमचे हे साहित्यिक आणीबाणीनंतरही पुढे आले नाहीत.

'आजची एकंदर राजकीय परिस्थिती पाहून काही करावंसंच वाटत नाही असं काही साहित्यिक आज म्हणतात. ही खोटी गोष्ट आहे. १९७७ सालीही हे लोक फॅशन म्हणून प्रचाराला बाहेर पडले. कारण जनतेचा लोढाच एवढा होता की, त्यांना दुसरा मार्गच उरला नाही. आज तशी परिस्थिती नसली तरी मत माडणं हे माझं कर्तव्य आहे हे लक्षात घेऊन साहित्यिक विचारवंतांनी पुढे आलं पाहिजे. पण याच्या डोक्यात गर्दी बसली आहे, भरपूर गर्दीशिवाय त्यांना काही सुचत नाही आणि मग अशी कारणं पुढे केली जातात; पण आता अशा तऱ्हेने दूर राहणाऱ्यांनी हेही लक्षात ठेवावं की यामुळे त्यांचं राजकारणावर टीका करायचंही स्वातंत्र्य नष्ट होतं. राजकारणावर बोलण्याचा अधिकार संपतो. आणि मग वन्हाटे निर्माण होतात. ज्याला राष्ट्र उभं करायचं आहे त्याला एका निराशेचं काय? आम्ही आमच्या 'उद्दिष्टांसाठी मरेपर्यंत लढू ही जिद्द आमच्यामध्ये असली पाहिजे.' आणि आम्ही जर मध्येच थकलो तर काहीही न बोलता गप्प राहण्याचीही तयारी आम्ही दाखवली पाहिजे.

'मुंबईला मृणाल गोरे उभी आहे, पण तिला फार कठीण जाणार आहे. रवींद्र वर्मा हा तिचा प्रतिस्पर्धी उमेदवार अतिशय हुशार, अबोल, सज्जन कार्यकर्ता आहे. एक आदर्श मंत्री आहे. कुठल्याही समाजात फेकला तरी सहज मिसळून जाईल असा आहे. मृणाल म्हणते की तो 'बाहेर'चा आहे, पण कार्पोरेशनच्या निवडणुकीला स्थानिक कार्यकर्ता लागतो. लोकसभेला नव्हे. मृणालचं कामही कॉर्पोरेशनच्या पातळीवरचं आहे. She is not a legislator. आणि जर लोकसभेला 'बाहेरचा उमेदवार अयोग्य असेल तर जॉर्ज, मधू कसं कुठूनही लढवतात? आम्ही या सर्वांना त्याच्या कामगिरीबद्दल बक्षिसी दिली, अधिकारही दिले; पण म्हणून जनतेचा गळा चिरायचा अधिकार त्यांना पोचत नाही.

'मी विदर्भ, खानदेश, कर्नाटक, रत्नागिरी वगैरे अनेक ठिकाणी जनता पक्षाच्या प्रचारासाठी हिंडले आणि मला पक्षाच्या दृष्टीने फारच आशादायक चित्र दिसलं. गोव्यातही जनता पक्षाबद्दल फार मोठी सहानुभूती आहे ऊन किंवा पावसाची तमा न बाळगता आमच्या सभांना लोकानी अतोनात गर्दी

केली. अशी गर्दी मी कुठे पाहिलीच नाही. कर्नाटकातल्या वर्तमानपत्रामध्येही जनता पक्षाला परिस्थिती अनुकूल होत चालल्याच्या बातम्या होत्या. संभाजीराव काकडेंच्या बारामती मतदारसंघातही आम्ही सभा घेतल्या. इंदापूर तालुका हा इंदिरा कॉंग्रेसचा बालेकिल्ला. पण तिथेही ८००–१००० माणसं सभेला आली होती. नीराला आम्ही आयत्या वेळी सभा घेतली, तरी तीन-चारशे लोक गोळा झाले. अशा लहान लहान गावांमधल्या सभा मला जास्त आवडतात.

'अर्थात मी हे जे काही करते आहे ते माझ्या स्वार्थासाठीच करत आहे. पण हा स्वार्थ समाजाशी जोडलेला आहे. आज आपल्याला मोठ्या नेत्याची फारशी गरज नाही. पण आपापल्या क्षेत्रातील वाकबगार, बुद्धिमान, निष्ठावान माणसांची गरज आहे. विरोधात काम करायचं असेल तर पुढारी लागतो, अन्यथा वैयक्तिक परिपूर्णतेमध्येच लोकशाहीची बीजं रुजलेली असतात. कोणालाही न दबणारी, कुणापुढेही न झुकणारी मूठभर तरी माणसं प्रत्येक समाजात असली पाहिजेत.

'मतदारांमध्ये आज सुस्तपणा आला आहे, निवडणूक इतक्या जवळ आली असतानाही सर्वत्र वातावरण थंडच आहे, असं म्हटलं जातं. पण मला असं वाटतं की जनतेचा निश्चय झालेला आहे. आम्ही मृणालच्या मतदारसंघात झोपडपट्टयांमध्ये जाऊन सभा घेतल्या तेव्हा 'मृणालला येऊ देऊ नका' अशी मागणी करत मतदारानी आम्हालाच घेराव घातले. बोरिवलीला रात्री अडीचला सभा संपली आणि अनेक बायका शेवटली लोकल निघून गेल्यामुळे चालत घरी गेल्या. विदर्भ–नागपुरातही आमच्या सभाना अलोट गर्दी होत होती. चादा, भंडारा, गोंदा या भागामध्ये पूर्वी कधीही झाली नव्हती अशी गर्दी सभाना व्हायची. थोडक्यात सांगायचं तर गेल्या वेळचं मतदान नकारात्मक ( Negative ) होतं, यावेळी खऱ्या अर्थाने होकारात्मक ( Positive ) मतदान होणार आहे आणि ते जनता पक्षाच्या बाजूने पडणार आहे.'

## 'जनता'लाच सत्तेवर आणणे आवश्यक आहे...' –अनंत काणेकर

येत्या निवडणुकीमध्ये प्रत्येकाने मत द्यायला गेले पाहिजे, इतकंच नव्हे तर जनता पक्षालाच हे मत दिलं पाहिजे. कारण आज ही पार्टी टिकवून धरणं अतिशय आवश्यक आहे.

तरुणपणाच्या धुंदीत मी अतिशय निष्ठावंत मार्क्सवादी होतो. त्यानंतर समाजवादी विचारसरणीचा माझ्या मनावर पगडा बसला. आजचे कित्येक समाजवादी नेते व कार्यकर्ते माझे चांगले मित्र आहेत. पण त्यांच्यापैकी काहींनी जनता पक्ष फोडला, इंदिरा गांधीला आपण मोठ्या नवससायासाने हरवलं होतं, आता याच लोकांनी तिला पुन्हा संधी प्राप्त करून दिली आहे. हे लोक संघवाल्यांना शिव्या देतात. पण दोन वर्षं त्यांच्याबरोबर राज्य करताना यांचा संघद्वेष कुठे गेला होता? उलट वाजपेयीसारख्या माणसाने या सबंध काळात एकही वावगा शब्द उच्चारला नाही. He is more secular than all these people. They have betrayed all. या फुटीर समाजवाद्यांनी स्वतःच्या कृतीने हातातली सत्ता गमावली.

'साहित्यिक विचारवंतांपैकी ज्याला जमेल त्या प्रत्येकाने जनता पक्षाच्या बाजूने निवडणुकीच्या प्रचारात भाग घेतला पाहिजे पु. ल.-दुर्गाबाईंनी घेतला. मीही जाणार होतो, पण आजारपणामुळे जाऊ शकलो नाही. जनता पार्टी फोडून चालणार नाही. पुन्हा एकदा याच पार्टीला सत्तेवर आणणं आवश्यक आहे. अन्यथा देशामध्ये स्थैर्य राहणार नाही. □

## साहित्यिक राजकारणापासून अलिप्त राहू शकत नाही.... –डॉ. य. दि. फडके

'आज राजकारण इतकं सर्वव्यापी झालं आहे की त्यापासून अलिप्त राहणं कोणालाच जमणार नाही. साहित्यिक–विचारवंतही पक्षीय सत्तास्पर्धेपासून अलिप्त राहू शकेल, उमेदवार म्हणून प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरणार नाही, पण स्वत चं मत त्याने मांडलं पाहिजे, यथाशक्ती प्रचारातही भाग घेतला पाहिजे. भाग घेण्याच्या प्रकारात फरक पडू शकेल पण अलिप्त मात्र राहता येणार नाही.

'याचबरोबर राजकारणाचा आज असलेला ढोबळ अर्थही बदलला पाहिजे. एखाद्या विचारवंताने सध्याच्या राजकारणाची वैचारिक मांडणी केली तर तोही त्याच्या राजकीय सहभागाचाच एक प्रकार होऊ शकेल. कारण त्यातून त्याची राजकीय मतेही स्पष्टपणे कळू शकतात.'

'आणीबाणीच्या काळात साहित्यिक–विचारवंत काही न करता गप्प बसले हे दुर्गाबाईंचं विधान अतिव्याप्त आहे. त्यांचं स्वत.चं धाडस कोणीही नाकारणार नाही, पण अशा प्रकारच्या लढ्यामध्ये अनेक प्रकारचं साहाय्य लागत असतं व अनेक साहित्यिक–विचारवंतांनी त्यामध्ये हातभार लावला आहे हेही नाकारून चालणार नाही. सत्याग्रह करून तुरुंगात जाण्याबरोबरच भूमिगताना आश्रय देण्यातही धोका होताच. अनेकांनी नंतर जनता पक्षाच्या प्रचारातही भाग घेतला. त्यामुळे दुर्गाबाईंची ही भूमिका एकारलेली वाटते. त्यांची साहित्यिक–विचारवंतांच्या आणीबाणीतील नाकर्तेपणाची विधानं ऐकून सर्वसामान्य माणसाची दिशाभूल होण्याचा संभव आहे आणि त्यामुळे अनेक साहित्यिक–विचारवंतांवर फार मोठा अन्याय होत आहे. कराडच्या साहित्य-संमेलनात दुर्गाबाईंनी यशवंतरावांना न रुचणारे विचार ठणकावून सांगितले हे त्याच

मोठेपण, पण साहित्यसंमेलन तरी राजकारणाच्या कचाटयातून कुठे सुटलं आहे? साहित्य संमेलन हे केवळ साहित्यविषयक असतं हे म्हणणं खोटं आहे. तिथेही अध्यक्षाच्या निवडीपासूनच गटबाजीच्या राजकारणाला सुरुवात होते हे दुर्लक्षून चालणार नाही.

आज 'विचारवंत' हा शब्द फार स्वस्त झाला आहे. त्यामुळे अनेकांची काही तरी गैरसमजूत होते. आपल्या वाटयाला काही खास भूमिका आली आहे असं त्याना हळूहळू वाटायला लागतं. प्रत्यक्षात असं असतं की त्याना सवड जास्त असते, त्यामुळे ते विचारही जास्त करू शकतात आणि स्वत च्या निष्ठा, श्रद्धेनुसार आपल्या विचाराची मांडणी करतात. पण म्हणून समाजाला आपणच वळण द्यायचं आहे ही कल्पना खोटी आहे. महाराष्ट्रातील काही विचारवंतांना आपली भूमिका 'राजगुरु'ची आहे असं वाटतं. पण तेही खरं नसतं. इथल्या बिलंदर राजकीय नेत्याच्या डावपेचाचे हे विचारवत बळी असतात.

'साहित्यिकाबद्दल बोलायचं झालं तर भोवतालच्या समाजातील अनुभव व्यक्त करण्याचं कसब साहित्यिकांजवळ असतं. ज्या वेळी अनेकाच्या व्यथाना एखादा साहित्यिक वाचा फोडतो. चागल्या शब्दात त्या व्यथा व्यक्त करतो. तेव्हा तो लोकप्रिय होतो. आयुष्याच्या तेवढ्या अवस्थेमध्ये तो वाचकाच्या गळयातील ताईत बनतो, पण ही अवस्थाही फार क्षणिक असते.

'आज सत्तेचा खेळ निर्दयपणे खेळला जात आहे. अशा वेळी हे साहित्यिक विचारवंत एकीकडे स्वत ला राजकीय नेत्यापेक्षा अधिक सज्जन, पवित्र मानतात, तर दुसऱ्या बाजूला याच राजकीय नेत्याची मर्जी संपादन करण्याची धडपड ते करतात. शिवाय शासनसंस्था सर्वव्यापी असल्यामुळे तितक्या प्रमाणात अवलंबित्वही येत असतं. आमच्या साहित्यिक विचारवंतानी हे धोके टाळले पाहिजेत. त्यांनी राजकारणावर सपूर्ण बहिष्कार टाकू नये, पण अवलंबूनही राहू नये. कोणत्याही प्रकारच्या राजकीय दडपणाला साहित्यिकानी बळी पडू नये. पण असं होत नाही. कारण त्याचेही काही हिशेब असतातच. दुर्गाबाई अशा तऱ्हेच्या कुठल्याही प्रलोभनांना बळी पडल्या नाहीत, म्हणूनच कराडच्या साहित्य संमेलनात स्वत.ची भूमिका त्या स्पष्टपणे सांडू शकल्या. कोणाचंही मिंधेपण दुर्गाबाईंनी कधीच स्वीकारलं नाही. सरकारात शिरून समाजाला वळण द्यायचें मोह काही विचारवंताना होतात. पण तेही कधीच यशस्वी होऊ शकत नाहीत.

'मी स्वत: आणीबाणीच्या काळात सरकारी प्रचारांच्या माध्यमावर बहिष्कार टाकला होता, माझ्या Social Reformers of Maharashtra या पुस्तकाचा २ ऑक्टोबर १९७५ ला दिल्लीला प्रकाशन समारंभ होता, पण मी त्यालाही गेलो नाही. आणीबाणीविरुद्ध साहित्यिक-विचारवंताचं पहिलं निषेधपत्रक काढण्यातही माझा पुढाकार होता. नागपूर विद्यापीठात मला भाषणासाठी बोलावलं. तेव्हा मी संजय गांधीच्या वर्तनावर टीका केली. बेचाळीसाव्या घटना दुरुस्तीवर हल्ला करण्यासाठी ठाणे जिल्ह्यात जागोजागी सभा घेतल्या, १९७५ साली ९ ते १५ ऑगस्ट हा आठवडा आम्ही 'स्वातंत्र्यसप्ताह' म्हणून केला. त्या आठवडयात आमच्या गटातील प्रत्येकजण एकेका स्वातंत्र्यासाठी लढलेल्या भारतीय सेनानीवर बोलला. मी आणीबाणीच्या परिस्थितीशी अनुरूप असे लोकमान्य टिळकाचे लेख वाचले. अर्थात हे सगळं आम्ही काही शौर्य म्हणून करत नव्हतो, अशा तऱ्हेने नाना प्रकारे प्रयत्न करणं आवश्यकच होतं. पण तो सबंध काळच असा होता की शासनाविरुद्ध काही लिहिलं तरी ते छापले जात नव्हतं. काही बोलल तर ते सांगितलं जात नव्हतं. आणि साहित्यिक विचारवंत या पलीकडे आणखी काय करणार?

'आजही साहित्यिक विचारवंतानी निवडणूक बाजूला ठेवून काही राजकीय सामाजिक issues घेऊन पुढे आलं पाहिजे. कारण मताचा हिशेब आला की प्रश्न बाजूला पडतात. साहित्यिक विचारवंतांनी अशा बाजूला पडू पाहणाऱ्या राजकीय-सामाजिक प्रश्नावर स्वत:चं लक्ष केंद्रित केलं पाहिजे आणि ते प्रश्न घेऊन उभं राहिलं पाहिजे'

# जनता पक्षातला कचरा आता गळून गेला आहे . . .

## —गो. नी. दांडेकर

गेल्या निवडणुकीत साहित्यिक विचारवंतांनी काय करावं हे सांगण्यापूर्वी मी स्वत: आणीबाणीच्या काळात व तदनंतर काय केलं ते आधी सांगतो. आणीबाणीच्या काळात इतरांप्रमाणेच मी अस्वस्थ होतो. त्यावेळी अशा अस्वस्थजणांची एक बैठक नागपूरला झाली. मीही त्या बैठकीस गेलो. नाना प्रकारच्या कृतीवर बैठकीत चर्चा झाली. सशस्त्र क्रांतीचासुद्धा विचार झाला. पण सशस्त्र क्रांती म्हणजे फाशी आणि फाशी म्हणजे पुन्हा अंधार, हे लक्षात आल्यामुळे तो विचार सोडून दिला. काही सुचत नव्हतं. सत्याग्रह करूनही फारसा काही उपयोग नव्हता. कारण त्यामुळे सत्याग्रहीच्या सख्येत वाढ होण्यापलीकडे फार काही होणार नव्हतं तेव्हा माझ्या असं मनात आलं की बाहेर राहूनच आपण जास्त चागलं काही तरी करू शकू.

'गंमत अशी झाली की याच वर्षी मला एकसष्टावं वर्ष लागलं. तेव्हा मी निरनिराळया ठिकाणच्या माझ्या परिचितांना असं कळवलं की मला एकसष्टावं वर्ष लागल्याबद्दल तुम्ही माझा सत्कार करा. अशा तऱ्हेने स्वत चे सत्कार घडवून आणणारा मी बहुधा पहिलाच साहित्यिक असेन. पण त्यामागे माझा उद्देश असा असे की त्यानिमित्ताने आणीबाणीविरोधी बोलता येत असे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मी अशा तऱ्हेने स्वत.चे सत्कार घडवून आणले आणि आणीबाणीवर जाहीरपणे टीका करण्याची संधी घेतली. वाईला माझी एक मोठी सभा झाली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सभेचे अध्यक्ष होते. मी माझ्या भाषणात सागितलं की आम्ही कोणाचंही ऐकणार नाही. आमच्या मनाला येईल ते आणि तसंच लिहू. लिहावंस वाटलं नाही तर लिहिणार नाही. पण

मलपृष्ठ १ वर

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# शब्दांनी भारलेला चौक

पूर्वी खेडेगावातून भारलेली ठिकाणे असत. आजही असतील. बोरीचं झाड–ज्याच्याभोवती मुंजा फिरतो आहे. बांबूचं बेट ज्याभोवती हडळ घुमते. पडकं जोतं–ज्यावर बसून भूत तुमच्याकडे टक लावतं. पडकी विहीर–ज्यातून जीव दिलेल्या बाईचं भूत ओरडत असतं.

शहरातही अशा भारलेल्या जागा असतात. तिथे भुतांचे वाडे असतात. कारखान्यांत भारलेल्या जागा असतात. जिथे कुठलेही यंत्र चालत नाही. रस्त्यांत एखादा खांब भारलेला असतो. ज्यावर हटकून रिक्षा, मोटारी, लॉरी येऊन आदळतात. आणि असे भारलेले चौक असतात की जेथे उभे राहताच ओरडून म्हणावेसे वाटते–'बंधूनो आणि भगिनींनो !' हे चौक शब्दांनी भारलेले असतात.

कल्याण गावी शिवाजी चौक म्हणून एक भारलेला चौक होता. सर्व तऱ्हेच्या सभा तिथे भरत. मीठाच्या सत्याग्रहावेळच्या रेल्वे कामगार संपाच्या, वेचाळीसच्या चळवळींतल्या आणि अनेक देशांतील कोणत्याही असंतोषाचे किंवा संतोषाचे शब्द तेथे उमटावयाचे. या सभांची व्यवस्था या चौकाजवळ राहणारे पटवर्धन म्हणून फोटोग्राफर करीत. तेथे भाषण करून गेलेल्या सर्व देशभक्तांपेक्षा मी त्यांना सर्वांहून मोठा देशभक्त समजतो. फोटो काढून घेणे त्याकाळी नवलाचेच असल्यानं पटवर्धन यांची परिस्थिती यथातथाच होती. सगळे कुटुंब खादीधारी होते आणि स्वतः सूत कातणारे होते. हे गृहस्थ किडकिडीत आणि गोरेपान होते. त्यांची हालचाल जलद असे. ते सभेची व्यवस्था ठेवीत. ठरावास पाठिंबा देणे किंवा आभार मानणे असे ते क्वचित करत असले तरी भाषण करीत नसत. बहुतेक सभा तेव्हा इंग्रज सरकारच्या विरुद्ध असल्याने पटवर्धनांच्या डोक्यावर नेहमी टांगती तलवार आहे. तरी सुद्धा ते नेहमी हसत मुख असत. त्यांचे बोलणे आर्जवी होते. हा एकटा माणूस सर्व सभांची व्यवस्था ठेऊ शके याचे कारण त्यावेळी एकच पक्ष होता. इंग्रजांची सत्ता घालविणारांचा. त्यावेळी 'एकेरी' सामना होता. आजच्यासारखे पंचरंगी, दशरंगी, शतरंगी सामने नव्हते.

पटवर्धनांकडे सभेचे सामान जय्यत तयार असे कुणी म्हटले 'पटवर्धन ! सभा घ्यावयाची आहे', तर ते म्हणत 'ठीक आहे.' मग सभेच्या वेळी चौकात ठरावीक कोपऱ्यात एक छोटेसे टेबल, खुर्ची, गडवाभांडे आणि तिरंगी निशाण आणून ठेवले जाई. टेबलावरची पांढरी स्वच्छ विणलेली चादर, फुलांची मांडणी, किंवा गुच्छ नारळ वगैरे गोष्टी पक्ष श्रीमंत होऊ लागल्यावर आल्या. सोबत आणलेले निशाण काठीवर लाऊन ती काठी टेबलापुढे ते रोवीत. हा झेंडा त्यांचा वुइक पॉईंट होता. वक्ता येईपर्यंत पाच पंचवीस श्रोते जमलेले असत. सभा संपेपर्यंत पटवर्धन प्रेक्षकात समोर बसत. सभा संपली की पटवर्धन टेबल खुर्ची, गडवा भांडे, निशाण घेऊन घरी जात.

अक्षरशः शेकडो सभांना त्यांनी ते केलं असलं पाहिजे. सभा मांडणं व आवरणं कोण करतं हे श्रोत्यांना कळतही नसेल. पटवर्धनांविषयी आता सांगतो आहे तेव्हा त्यांचे आणखी एक वैशिष्ट होते तेही सांगतो. ते रोज आपल्या दुकानापुढे एक राजकीय व्यंगचित्र कापडाच्या फलकावर काढीत. कल्पना त्यांची स्वतःची असे. जाणारा येणारा प्रत्येकजण दोन मिनिटं उभे राहून 'आज काय काढलंय पटवर्धनांनी ?' म्हणून पाहून जाई ती व्यंगचित्रे खोचक व विनोदी असत. ब्रिटीश राज्याविरुद्ध असत. आज देशभर गाजलेल्या लक्ष्मणचे आमचे पटवर्धन गुरु असले पाहिजेत. मला तर वाटते की त्यांच्या व्यंगचित्रांचा मारा असह्य होऊनच इंग्रजांनी पलायन केले असावे.

□

शब्दांनी भारलेल्या चौकांवरून हे सर्व निघाले. असा एक भारलेला चौक पुण्यात आमच्याजवळ आहे. इतर पेठेतही आहेत. हा चौक बाजीराव रस्त्यावर टेलिफोन भवनसमोर झाला आहे. या चौकात व्यासपीठ उभारून व्याख्याने होत असतात. प्रेक्षक समोर रस्त्यावर बसतात. जास्त गर्दी झाली तर ती चारी रस्त्यांतून चार दिशेला पसरते.

डिसेंबर, दिनांक सोळाला अशीच एक सभा

झाली. सभेत मुख्य वक्ते होते माजी पंतप्रधान मोरारजीभाई. मी तिकडे गेलो तेव्हा चौक भरगच्च भरला होता. बाजीराव रस्ता अलीकडे बंद करून वाहतूक भिकारदास मारुतीच्या रस्त्याने नेली होती. भिकारदास मारुतीचा भाग, जवळचा पार, पारा शेजाराचा पी. एम्. टी. स्टॅंड, पलीकडची मुतारी त्यातून रस्त्यावर वहात येणारे पाणी, लागून असलेले दूध केंद्र, हातागाड्या आणि रहदारी यानी गजबजून गेला होता.

सभेत मोरारजीभाईंनी पुण्यातील जनता पक्षाच्या निवडणूक प्रचाराचा नारळ फोडला. अध्यक्षस्थानी होते पुण्याच्या जनता पक्षाचे अध्यक्ष अण्णा जोशी मोरारजीभाईंनी अक्षरशः पहिल्या घावात नारळ फोडला आणि टाळ्या मिळविल्या. नंतर भाषणात ते म्हणाले, 'आपल्या देशाला दुहीचा शाप आहे. हा मूळ स्वभाव विसरून काही वर्षे लोक एकत्र आले तोच जनता पक्ष. आम्ही स्वस्ताई आणली, भाव स्थिर ठेवले, सत्तेसाठी सौदा करावयाचा नसल्याने आम्ही सत्ता सोडली.' देसाई पुढे म्हणाले, 'आपल्याला दोन आघाड्यावर लढावयाचे आहे. हुकूमशाही आणि दलबदलू या त्या दोन आघाड्या. या लोकांसंबंधी काय करावयाचे व मते कुणाला द्यावयाची हे ज्याचे त्यानी विचार करून ठरवावे.'

काही वर्षांपूर्वी स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर प्रचंड अशी सभा झाली होती. त्यानंतरचे हे आताचे छोट्या सभेचे दृश्य अगदी निराळे होते. मला ते आवडले. तेव्हा मोरारजी खूप उंचावर असलेल्या व्यासपीठावर उभे होते व खूप अंतरावरून आम्हाला ते भावलीसारखे दिसत होते. आता ते कमी उंच व्यासपीठावर अगदी समोर स्पष्ट कळत होते. माणूस एकदा पंतप्रधान असो की काही असो त्याला पुन्हा निवडून येण्यासाठी चौकातील व्यासपीठावर उभे रहायलाच हवे. चौकांतील व्यासपीठही जरा उंचच करतात. तेही नको. पटवर्धनांचे चादर नसलेले एक टेबल, मागे एक खुर्ची असो नसो. म्हणजे उमेदवारालाही आपण जनतेपेक्षा उंच वाटणार नाही व जनतेलाही पुढाऱ्यापेक्षा नीच वाटणार नाही अमेरिकेतील एक गोष्ट सागतात, तेथे पहिल्या पहिल्या अध्यक्षांपैकी एक अध्यक्ष रस्त्यातून चालला होता. रस्त्यात बरीच गर्दी होती व धक्के चुकवण्याचा यत्न करीत नागरीक जात होते. समोरून आपल्या देशाच्या अध्यक्षाला येताना पाहून एक नागरिक म्हणाला अध्यक्ष येत आहे आपण त्याला वाट करून देऊ. तेव्हा शेजारचा नागरिक म्हणाला, 'का म्हणून ? तो आपल्याचसारखा नागरिक आहे अध्यक्ष असला तर सिनेटमध्ये. रस्त्यावर माझ्यात व त्यांच्यात काही अंतर नाही. काय सांगावे उद्या मी किंवा तुम्ही कुणीही अध्यक्ष होऊ.' असे म्हणून त्या नागरिकाने पुढे होऊन दाटीगर्दीतून अध्यक्षाशी जाऊन त्याला खाद्याचा धक्का दिला व रितीप्रमाणे 'माफ करा' म्हणत तो पुढे गेला.

तेव्हा, कुणाला दुष्ट वाटलं तरी, मोरारजीभाई स. प. मैदानावरील उंच व्यासपीठावरून आमच्या चौकात आले हे मला लोकशाहीच्या दृष्टीने बरे वाटले या सभेतील भाषणात मोरारजी आणखी म्हणाले की, 'केवळ सत्ता मिळावी म्हणून नव्हे तर जनतेच्या सकटात साथ देता यावी म्हणून जनता पक्ष मतदाराचे सहाय्य मागत आहे देशात पुन्हा हुकूमशाही आली— तसे होणार नाही ही माझी खात्री आहे— पण चुकूनही आली तर आपल्या रक्षणासाठी जनता पक्षच प्राणपणाने लढेल.'

त्यानंतर नानासाहेब गोरे बोलले. प्रथम त्यांनी एक उतारा वाचून दाखविला. तो असा, 'या देशातील बहुसंख्य जनता निरक्षर असली तरी विचारी, विवेकी आहे. कॉंग्रेसला पाडून लोकशाही या जनतेनेच वाचवली. त्याबद्दल आभारीच राहिले पाहिजे. १९७७ च्या कॉंग्रेसच्या पराभवाने राष्ट्र वाचले हे लक्षात ठेऊन कॉंग्रेसजनानी जनतेची क्षमा मागितली पाहिजे.'

हा उतारा वाचून गोरे म्हणाले, 'पुन्हा त्याना असे लिहिण्याची संधी आणून दिली पाहिजे.'

□

पहाता पहाता आमच्या पिढीच्या डोळ्यासमोर कॉंग्रेस वर चढली आणि पिढीच्या डोळ्यासमोर खाली आली. आम्हाला कॉंग्रेस अक्षय वाटत होती, असाधारण वाटत होती, अभेद्य वाटत होती. आमच्या बायकांनी हातातले स्त्रीधन काढन महात्मा गांधीपुढे टाकले होते. गोळीबार आणि टिअरगॅसची पर्वा न करता आम्ही सभा दुमदुमवल्या होत्या. आता त्या कॉंग्रेसची नावनिशाणी तरी राहील का अशी शंका वाटू लागली आहे. स्वातंत्र्य मिळताच महात्मा गाधींनी कॉंग्रेस विसर्जित करा असे सांगितले होते. त्यांचे ऐकून ती जर तेव्हाच विसर्जित केली असती तर मानाने विसर्जित झाली असती. सगळी इंग्रजी मुळाक्षरे संपतील इतके तिचे विभाजन झाले नसते. आजच्यासारखी सर्वत्र फजिती झाली नसती किंवा आम्हाला फजित केले नसते. आपण फार श्रद्धा ठेवतो ते चुकते. पक्षही क्षणभंगुर असतात.

टेलिफोनभवन नाव असलेल्या या चौकात दुसरे दिवशी हिंदुसभेची निवडणूक सभा झाली. यावेळी वक्त्याचे तोंड टेलिफोन भवनकडे होते. सभेला पन्नास लोक होते. आणि त्यातले काही आमच्याप्रमाणे जाताजाता डोकावणारे होते. एक जुनाट टेबल व खुर्ची एवढाच सभेचा थाट होता. थोडक्यात ती पूर्वीची 'पटवर्धनी' सभा होती. सभेत हिंदुसभेचे दाते बोलत होते. या देशात हिंदूना जातीय ठरविणाऱ्या व मुसलमानांना जातीय होण्यास उत्तेजन देणाऱ्या कॉंग्रेसच्या धोरणाबद्दल ते बोलत होते.

दाते यांच्या व्याख्यानातील आणखीही मुद्दे सागता येतील. पण मुख्य मुद्दा याच चौकात आधी जनतेची मग हिंदुसभेची, उद्या कोणत्या तरी कॉंग्रेसची व परवा आणखी एखाद्या पक्षाची सभा झडेल हा

आहे. पक्ष व पुढारी यांचे इतके घोटाळे आहेत की माझ्या लक्षात राहत नाहीत. या पक्षाचा पुढारी त्या पक्षात व त्या पक्षाचा पुढारी या पक्षात मी घालून देशाच्या बेदिलीत मी आणखी बेदिली निर्माण करतो. म्हणूनच बोलावयास आलेल्या माणसाची ओळख लागली नाही की आपण मोघम बोलत राहतो तसे मी करतो. मी एवढेच म्हणतो की चौक सर्वांना मुक्त असावेत. फक्त त्यानी एकामागून एक येऊन बोलावे. चौकांतल्या सभा झाल्याच पाहिजेत.

येथे मला इंग्लंडमधील हाईडपार्कवरील सभांची आठवण येते. म्हणजे मी इंग्लंडला होतो असा याचा अर्थ नाही. ही ऐकीव गोष्ट आहे. हाईडपार्कमध्ये एक चौक आहे. तिथे अशाच सभा होतात. एक माणूस येऊन बोलू लागतो. पाच पंचवीस लोक जमतात. काही वहाते श्रोते असतात. या जागी इंग्लंडमधील लहान मोठे, सर्व पक्षाचे पुढारी व इतर विद्वान येऊन बोलून गेले आहेत व अजून येतात व बोलतात. शब्दानी भारलेले हे व्यासपीठ आहे. येथून फेकलेले शब्द जगभर पसरतात.

ही ऐकीव गोष्ट खरी असेल नसेल पण या हाईडपार्कमधील सभाप्रमाणे आपल्याकडील चौकांतील सभाचे व्हावे. गावोगावी असे चौक असावेत. ज्यांना काही सागावयाचे आहे त्यानी येथे उभे राहून हात वर करून ओरडावे, 'बंधु भगिनीनो! माझे काही विचार सांगण्यास मी उभा आहे.' पाच पंचवीस लोकांनी जमावे. ऐकून पुढे जावे. जाताना म्हणावे 'कल्पना बरी होती.' विचारांच्या देवघेवीने हा देश अधिकाधिक सुसंस्कृत व्हावा. या चौकात राजकारणी लोकांनीच बोलावे असे नाही. तर इथे उभे राहून विमान कसे उडते हे सांगावे, ज्ञानेश्वरीतील सौदर्य सांगावे, अणूची रचना सागावी, भजन करावे, पक्षाची माहिती द्यावी, जे आपणास ठाऊक आहे ते सागावे.

यापुढे बाबूच्या बनातल्या प्रचंड सभा बंद कराव्यात. मला स्वतःला या प्रचंड सभांच्या बांबूच्या पिंजऱ्यात शिरताना गुदमरल्यासारखे होते. अशा सभाचे व्यासपीठ ऊंच ऊंच होत जाते. तेथे उभा राहणारा पुढारी भव्य होत जातो व आम्ही ऐकणारे अंगुष्ठमात्रही राहत नाही. या प्रचंड बांबू सभानीच आपली लोकशाही धोक्यात आणली नसेल ना असा मला संशय येतो. उंच उंच अशा या व्यासपीठावरचा पुढारी बाबूच्या चौकटीत वळवळणाऱ्या किडयाकडे पाहतो व त्याला आवेश येतो. तो मूठ वर करतो व जयजयकार होतो. आपल्या शक्तीची त्याला आणखी खात्री पटते. तो पुन्हा मूठ वर उगारतो व आणखी प्रचंड जयजयकार होतो. आणि हुकूमशहा निर्माण होतो. त्याच्या खाद्याला खादा भिडविण्याची गोष्ट मैल मैल दूर राहते.

आता या बाबूसभा बंदच कराव्यात. गावाच्या आकार मानाप्रमाणेच गावात एक किंवा अनेक लोकशाही चौक असावेत. तेथून लोकशाहीचा व ज्ञानाचा प्रचार व्हावा. अशा चौकाशेजारी एक 'पटवर्धन' राहत असावा. त्याला सूचना मिळताच त्याने सभेच्या वेळेआधी एक जुनी टेबल खुर्ची चौकात आणून ठेवावी. गडवा भाडे आणावे. चादर किंवा फुलाचा गुच्छ आणू नये. लोकशाही टिकवावयाची असेल तर चौकाचौकात अशा सभा व्हाव्यात. शब्दांनी भारलेले चौक निर्माण व्हावेत. □

**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**
**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

**लेखक : वि. ग. कानिटकर**
**आवृत्ती : तिसरी (सचित्र)**
**किंमत : रुपये पंचेचाळीस**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# निवडणुकीपलीकडे

**वा. दा. रानडे**


निवडणुक प्रचार मोहिमेने आता शेवटच्या टप्प्यात प्रवेश केला आहे. कोणत्या पक्षाला आणि उमेदवाराला निवडून द्यावयाचे याचा निर्णय तर मतदारांनी घ्यावयाला हवाच. पण आमचे राजकारण नेहमी निवडणुकीच्या चक्रातच गुरफटलेले राहणार की निवडणुकीपलीकडे जाऊन काही दूरगामी कार्यक्रमाची आखणी आपण करणार आहोत ? त्यादृष्टीने विचार तरी केला जात आहे का ? हा विचार जयप्रकाशजींनी काही वर्षांपूर्वीच मांडला आहे पण भाषणातून जयप्रकाशजींच्या संपूर्ण क्रांतीचा उद्‌घोष करावयाचा आणि प्रत्यक्षात मात्र निवडणुकीच्या आणि सत्तेच्या राजकारणातच गुरफटून जावयाचे अशी प्रवृत्ती काही अपवाद वगळता बहुसंख्य राजकीय नेत्यांची दिसून येते.

मतदार समित्यांचे जाळे देशभर उभारण्याचे कार्य या निवडणुकापासून तरी होणार आहे का ? प्रत्येक मतदान केंद्र हा प्राथमिक घटक धरून विधानसभा मतदारसंघ समिती, लोकसभा मतदारसंघ समिती, राज्य समिती, केंद्रीय समिती अशा पद्धतीने या समित्यांची संघटना उभारायला हवी. सध्या काही ठिकाणी लोकसमित्या किंवा मतदारसमित्या कार्य करीत आहेत व त्यांची रचनाही मतदाराची सभा बोलावून लोकशाही पद्धतीने झाली आहे का, त्याचा विचार करायला हवा. जयप्रकाशजींनी मांडलेली कल्पना आदर्श आहे. त्याप्रमाणे प्रत्यक्षात कार्य करणे फार कठीण आहे. फारच थोडे मतदार अशा सभाना येतात, या कामात उत्साह दाखवितात असे म्हटले जाते आणि ते बऱ्याच प्रमाणात खरेही आहे. मग यावर उपाय काय ? एकदम फार मोठ्या प्रमाणावर मतदार संघटना उभारण्याच्या मागे न लागता काही थोड्या विधानसभा व लोकसभा मतदारसंघात अशी संघटना तळापासून उभारण्याच्या कार्यावर लक्ष केंद्रित करायला हवे, या समित्यांचे काम चांगले चालू आहे असे दिसून आले तर त्यापासून स्फूर्ती घेऊन इतर ठिकाणीही अशा समित्या उभारल्या जातील पण त्यासाठी पहिली आवश्यकता आहे ती सत्तेच्या व निवडणुकीच्या राजकारणापासून दूर राहून या कार्यालाच वाहून घेणाऱ्या कार्यकर्त्यांची.

समजा अशा मतदारसमित्या स्थापल्या तरी त्यांना नेहमी काय काम असणार असा प्रश्न कोणाच्याही मनात येईल. मतदार विधानसभेसाठी किंवा लोकसभेसाठी मतदान करतो तसेच ग्रामपंचायत, नगरपालिका, किंवा महापालिका यांचे प्रतिनिधी निवडणुकीसाठी मतदान करीत असतात.आपापल्या भागातील स्थानिक प्रश्न त्यांना धसास लावता येतील, गाऱ्हाणी दूर करून घेता येतील, आपल्या भागात आरोग्याच्या किमान सोयी आहेत का ? नित्याच्या गरजेच्या वस्तू सर्वांना मिळतात का ? दुकानात धान्य, रॉकेल, साखर आहे पण ते घेण्याची ज्याची ऐपत नाही अशा आर्थिकदृष्ट्या दुबळ्या घटकासाठी आपण काय करू शकतो ? या माणसाजवळ पैसा आहे पण तो व्यसनात घालवितो. त्यांना दिलेला पैसाही ते व्यसनात घालवतील असे म्हटले जाते व काही प्रमाणात ते खरेही आहे त्यासाठी मग व्यसनमुक्तीचे कार्य त्यांच्यात करायला हवे. प्रथम निराशाच पदरी येईल पण चिकाटीने कार्य चालू ठेवल्यावर त्याचे परिणाम दिसू लागतील. आपल्या भागातील शालेय वयाची सर्व मुले शाळेत जातात का ? हेही पाहायला हवे. त्यांच्या काही अडचणी असतील तर त्या दूर करायला हव्यात. जी मुले अभ्यासात मागे आहेत त्यांचा अभ्यास सुधारण्यासाठी त्यांना मार्गदर्शन, मदत मिळायला हवी. पालक-शिक्षक संघ हे कार्य काही ठिकाणी करीत आहेत पण ते मुख्यत मोठ्या शहरातील काही भागापुरतेच मर्यादित आहे. याबाबतीत ग्रामीण भाग दुर्लक्षितच आहे. मुलांच्या दृष्टीने दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे अपुऱ्या पोषणाचा. काही थोड्या शाळामधून मधल्या सुटीत पूरक आहार दिला जातो. आपल्या भागातील मुलांचा पूरक आहाराचा प्रश्न कसा सोडविता येईल याची योजना आखायला हवी. आपल्या भागात बेकार किती आहेत, त्यांना काम देण्याची योजना काही आखता येईल का ? हेहि पहायला हवे. आपल्या भागात सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय, मुलांना खेळण्यासाठी मैदान या सोयी नसतील तर करायला हव्यात. निरनिराळ्या विषयावर तज्ज्ञांची व्याख्याने, चर्चा घडवून आणायला हव्यात. दलितांना इतरांच्या बरोबरीने वागणूक मिळते की नाही की त्यांना हीन लेखले जाते ? त्यांच्यावरील अन्यायाचीही दाद लावून घ्यावयास हवी. आपल्या भागातील वृद्ध व रुग्ण यांची योग्य देखभाल केली जाते का याकडेही लक्ष द्यावयास हवे. आपल्या भागातील लोकांच्या सुप्त कलागुणांच्या विकासास योग्य वाव मिळण्यासाठी सांस्कृतिक केंद्र काढून, कार्यक्रम सादर करणे या दृष्टीने प्रयत्न करता येतील. करावयाचे कार्य खूप आहे. येथे केवळ काही गोष्टींचा उल्लेख केला.

मी जे हे लिहिले त्यात नवीन काय आहे असे अनेकांना वाटेल. मतदारांचा संबंध यात येतो कोठे असाही प्रश्न काहींच्या मनात येईल. मतदाराचे मुख्य काम मत देण्याचे. ते तो नीट बजावतो की नाही एवढेच तुम्ही पहा. त्याच्याकडून आणखी अनेक गोष्टी तुम्ही अपेक्षिता हे कितपत बरोबर आहे असाही प्रश्न काहींच्या मनात येईल. मतदाराचे कर्तव्य केवळ मत देऊन संपत नाही. मतदार हा केवळ मतपेटीत मत टाकण्यापुरता मतदार नसतो. हे मत तो केवळ एक व्यक्ती म्हणून टाकत नाही तर मतदान हा त्याच्या नागरी कर्तव्याचा एक भाग आहे. समाजाचा जबाबदार घटक या नात्याने त्याने आपली कर्तव्ये व जबाबदारी पार पाडली पाहिजे. त्यासाठी व्यक्ती केवळ आत्मकेंद्रित बनून स्वतःच्या सुख-चैनीतच मग्न न होता समाजाभिमुख बनली पाहिजे. आपल्या राहणीमानाचा दर्जा वाढविण्याचे प्रयत्न चालू ठेवतानाच आपल्यापेक्षा ज्यांचे राहणीमान कमी आहे त्यांना आपल्याबरोबर कसे आणता येईल याचाही विचार आणि त्यादृष्टीने प्रयत्न करायला हवेत. आपले राजकारण, समाजकारण, अर्थकारण, किंबहुना जीवनाच्या सर्वच क्षेत्रात समाजाभिमुख वृत्तीचा लोप आणि स्वार्थी, आत्मकेंद्रित वृत्तीची वाढ हे आपल्या सर्व दोषाचे प्रमुख कारण आहे.

केवळ निवडणुका घेऊन व सरकार बदलून हे प्रश्न सुटणारे नाहीत. त्यासाठी मुख्यतः त्रिविध आघाड्यावर कार्य करायला हवे. एक विधिमंडळाची आघाडी, दुसरी विधायक कार्याची आघाडी आणि तिसरी अन्याय निवारणासाठी संघर्षाची आघाडी. या तिन्ही आघाड्यांचा एकमेकांशी समन्वय हवा. सहचार्य हवे. संपूर्ण क्रांती हे एकच उद्दिष्ट त्यामागे हवे. संपूर्ण क्रांतीस सत्ता वर्ज्य नाही पण तिचा उपयोग समाजपरिवर्तनासाठी केला जावा. विधायक कार्य आणि संघर्ष यातही विरोध असण्याचे कारण नाही. ज्यागोष्टी विधायक कार्याने करणे शक्य आहेत त्यासाठी संघर्षाची आवश्यकता नाही. पण अन्यायाविरुद्ध आवश्यक तेथे संघर्ष करायलाच हवा. आवश्यकता आहे ती या तिन्ही प्रकारच्या कार्यात समन्वय साधण्याची. □



# इंदिरा काँग्रेसला किती जागा मिळतील ? एक गणित

## जनार्दन ठाकुर

या खेपेच्या मध्यावधी निवडणुका या देशाच्या इतिहासात वैशिष्टय-पूर्ण ठराव्यात. १९७७ पेक्षा तर निश्चितच वेगळ्या. त्या निवडणुकीत देशातील बहुतेक राज्यांत एकतर्फीच मतदान झाले. जात-पात, वर्ग-वर्ण, पक्ष-गट यांच्या सर्वमान्य सीमा उल्लंघून झाले मतदान. या खेपेस, पुन्हा एकदा या लौकिक घटकांना प्राधान्य मिळणार असे दिसते. त्याचबरोबर लढतीत भाग घेणाऱ्यांना या आधी अस्तित्वात नसलेल्या परिस्थितीला व युतींना तोंड द्यावे लागणार हे नक्की. चांगले म्हणा, वाईट म्हणा, जात आणि वर्गभेद यांचा खेळ या आधी कधीही गेला नसेल इतक्या विकोपाला जाईल असाही एक कयास आहे.

पुन्हा एकदा उत्तर भारत आणि दक्षिण भारत आपापली चित्रे वेगळ्या रंगाने रेखाटण्याची शक्यता आहेच. आपण एक सर्वसाधारण विधान ऐकतो-' दक्षिण भारत श्रीमती गांधींचा ! ' दक्षिण भारत जनताच्या कह्यात नव्हताच. १९७७ मध्ये व १९७८ च्या विधानसभा निवडणुकीतही आंध्र प्रदेश व कर्नाटकात बाईंचा पक्ष उजळून निघाला. पक्षाच्या यशाने बाईंच्या पुनरागमनाच्या आशा पालवल्या. चला, गणित मांडू या. येत्या निवडणुकीत आंध्र प्रदेशात बाई बहुतेक जागा घेतील, जवळजवळ सर्व म्हणू. देवराज अर्सचा विरोध असूनही कर्नाटकात स्पष्ट बहुमत मिळेल. पण ही दोन राज्ये म्हणजे दक्षिण भारत नव्हे. केरळ राज्यात बाईंना आशाच नाही. तिकडे पूज्यच वाटयाला यावे. तामिळनाडूमध्ये जरी द्रमुकशी समझोता असला, लोक त्यांना पहायला गर्दी करत असले तरी ३९ पैकी ७ जागा जरी जिंकल्या तरी डोक्यावरून पाणी गेले म्हणू या. थोडक्यात आंध्रमध्ये ४२ पैकी शिकस्त ३७, कर्नाटकात २८ पैकी १६ जागा जमेस धरल्या तरी दक्षिणेत इंदिरा गांधींना ६० पेक्षा जास्त जागा मिळणे अवघड वाटते. महाराष्ट्रातील वैफल्यग्रस्त व कासावीस झालेले काँग्रेसजन बाईंच्या गोटात पुनर्प्रवेश करते झाले असले, विदर्भ व मराठवाडा विभागात त्यांची ताकद बरी आहे असे मानले तरी फार तर ४८ पैकी २४ जागांची आशा करावी त्यांनी. गुजरातच्या परिस्थितीचा अंदाज करायचा झाल्यास जास्तीत जास्त १३ जागा पदरात पडतील. त्या किंचित जादाच धरल्या आहेत. म्हणजे या दोन राज्यात मिळून ३७ जागा होतात, आणि एकूण आकडा येतो ९७.

म्हणजे शेवटी आपण नेहमीच्याच जागी येऊन थांबतो. इंदिरा काँग्रेस वा आणखी कोणत्याही पक्षाला लोकसभेत निर्विवाद बहुमत मिळायचे असेल तर त्याला उत्तरेकडील राज्यात, विशेषतः उत्तर प्रदेश व बिहारात ( या दोन राज्यांना मिळालेल्या जागा दक्षिण भारतातील चारी राज्यांच्या एकत्रित जागांपेक्षा जास्त आहेत ) घवघवीत यश मिळवणे अत्यावश्यक आहे. उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान, दिल्ली, पंजाब, हरयाना व हिमाचल प्रदेश या सर्वांना मिळून ५४४ पैकी २३८ जागा असतात. आता या बाजूची परिस्थिती पाहू या. मध्य प्रदेश जनसंघाचा बालेकिल्ला जनता व इंदिरा काँग्रेस यांच्यातच खरा सामना. तेथे ४० पैकी १२ जागा मिळाल्या तरी नशीब. राजस्थानमध्येही जनसंघच प्रबळ. येथे मागासवर्गीय जनता ( एस ) जनताशी चांगली झुंज देईल. इंदिरा काँग्रेस व जनता वरच्या वर्गावर अवलंबून राहाणार. त्यामुळे त्यांची मते विभागली जाणार. त्याच्या उलट जनता ( एस ) हरिजन व काही प्रमाणात मुसलमानांची मते खाणार व त्याचा परिणाम होऊन इंदिरा काँग्रेसची मते घटणार. म्हणजे या राज्यात जनताला संधी चांगली आहे. कारण, त्यांचे सरकार व रा. स्व. संघ यांची कुमक त्यांना आहे. तेव्हा श्रीमती गांधींना २५ पैकी ६ जागा मिळाल्या तरी त्यांनी खूप व्हावे.

पंजाबात अकालींच्या फाटाफुटीमुळे १३ पैकी ३–४ जागांची

अपेक्षा ठेवावी बाईंनी. हरयानात २ पेक्षा अधिकाची अपेक्षा नको. हिमाचल प्रदेश शून्यच. दिल्लीमध्ये बाईंच्या बाजूने वारा वाहतो आहे म्हणन ७ पैकी ४ जागा जिंकेल त्यांचा पक्ष.

आता वळू या निर्णायक रणक्षेत्राकडे. बिहार व उत्तर प्रदेश. १९७१ मध्ये, श्रीमती गांधी वैभवाच्या शिखरावर असताना, त्यांना ४० टक्के मते पडली पण जागा मात्र ५४ पैकी ३९ मिळाल्या. उत्तर प्रदेशात ४८.५७ टक्के मते व ८५ पैकी ७३ जागा मिळाल्या. ही मते मुख्यत्वे करून वरच्या जाती, हरिजन व मुसलमानांची होती. मधल्या जातीही बऱ्यापैकी होत्या.

आता बिहारातील विविध जातीचे वर्गीकरण पाहू या.

| विभाग | जातींचा गट | लोकसंख्येचे प्रमाण |
|---|---|---|
| वरिष्ठ जाती | ब्राह्मण | ४·७ |
| | भूमिहार | २·९ |
| | रजपूत | ४·२ |
| | कायस्थ | १·२ |
| | बनिया | ०·६ |
| | एकूण | १३·६ |
| मध्यम जाती | यादव | ११·० |
| | कुर्मी | ३·६ |
| | कोयरी | ४·१ |
| | बान्ही | १·० |
| | धनुक | १·८ |
| | कहार | १·७ |
| | कान्डू | १·६ |
| | कुंभार | १·३ |
| | मल्ला | १·५ |
| | नाभिक (हजाम) | १.४ |
| | तटवा | १·६ |
| | तेली | २·८ |
| | इतर मागास | १६·० |
| | एकूण | ५०·७ |
| मुसलमान | | १२·५ |
| हरिजन | | १४·१ |
| वर्गीकृत जमाती | | ९·१ |

या तक्त्यावरून दिसून येईल, 'मध्यम जाती'चे प्राबल्य मोठे आहे बिहारात. उत्तर प्रदेशातील स्थिती किंचित वेगळी आहे. तेथे मधल्या जाती ३५ टक्के आणि वरिष्ठ वर्ग साधारणपणे २५ टक्के आहे. या खेपेस आयुष्यात प्रथमच इंदिरा गांधीना या दोन्ही राज्यांत एकत्र आलेल्या या 'मध्यम वर्गा'ला तोंड द्यावे लागणार. विशेषत: बिहारमध्ये कर्पूरी ठाकूर – हे स्वत: नाभिक आहेत – यांच्या नेतृत्वाखाली लढणाऱ्या आक्रमक शक्तीबरोबर सामना आहे त्यांचा. कर्पूरींना कुमक आहे काँग्रेसच्या राम लखनसिंग यादवांची आणि यादवांचे नेतृत्व वादातीत आहे. त्यांच्या प्रयत्नाने लोकदल–काँग्रेस युती बरीच मते पदरात पाडून घेणार. बिहारची गंमत हीच आहे. इतके दिवस बिहारमध्ये वरिष्ठ जातीचा असलेला वरचष्मा आता खूपच कमी झालेला आहे. तेथील राजकीय सत्ता त्याच्या ठायी केंद्रित झालेल्याला बरेच दिवस होऊन गेले होते. आता त्याच्या हाती नुसती दोरी उरली होती, जनावर केव्हाच निसटून गेले होते नोकऱ्यासाठी जागा राखून ठेवण्याच्या प्रश्नावर बिहारमध्ये झालेल्या आंदोलनात असा एकही राजकीय पक्ष किंवा एकही राजकीय वा निमराजकीय संघटना नव्हती की जिच्यामध्ये बेबनाव नव्हता. अगदी कट्टर विरोधकानादेखील त्या प्रश्नाच्या तत्त्वाला विरोध करण्याचे नैतिक धैर्य उरलेले नव्हते.

## चरणसिंगांचा उदय

या पिछड्या जमाती एकत्र येण्याला, आपल्या सामर्थ्याची त्यांना जाणीव व्हायला असे एखादे आकस्मिक कारण नव्हते घडले, दशकानुदशकाचा इतिहास होता त्यामागे. काँग्रेसच्या मतात झालेली घट १९५२ पासून १९६७ पर्यंत टप्प्याटप्प्याने होत गेली. लोहियाच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या संयुक्त–समाजवादी पक्षाच्या ध्वजाखाली या जमाती प्रथम एकत्र आल्या. १९६७ मध्ये बिहार विधान सभेत त्या पक्षाचे सभासद सर्वांत जास्त होते. स्वत: चरणसिंग १९५०–५२ मध्ये तालुका पातळीवरचे एक नेते होते. १९६७ मध्ये ते उत्तर प्रदेशचे मुख्य मंत्री झाले तर १९७९ मध्ये भारताचे पंतप्रधान! त्यांचा हा उदय आणि उत्कर्ष म्हणजे उत्तर भारतातील मध्यम जमातीच्या वाढत्या सामर्थ्याचाच परिपाक मानावा लागेल. त्याचे मूळ शोधायचे झाल्यास दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या कालखंडात प्रवेश करावा. त्या काळात एकाकी अन्नधान्याचे भाव भडकले आणि जमीन महसुलाचे ओझे बरेच कमी झाले. बहुतांशी शेतकरी असल्याने या जमातीचे उत्पन्न वाढले. हळूहळू, ठाकुर व भूमिहार यांच्याकडे गहाण पडलेल्या आपल्या जमिनी त्यानी सोडवून घ्यायला सुरुवात केली. हे सारे लोक 'गैरहजर मालक' बनून राहात होते. ब्रिटिशांनी मागे ठेवलेल्या राजकीय व प्रशासकीय मिळकतीत त्यांनी वाटा घेतला होता. साहजिकच सत्ता हातात असल्याने त्यांनी या पिछड्या जमातीना राजकीय व प्रशासकीय स्थानांपासून शक्य तितके दूर ठेवण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा हा खटाटोप फार काळ टिकू शकला नाही. प्रौढ मतदान व शैक्षणिक प्रगती यांच्या सहाय्याने या जमाती पुढे येत राहिल्या. लोकसभा व विधानसभेतील त्यांच्या प्रमाणात अपेक्षित वाढ होत चालली. १९५२-५७-२२·४%, १९५७–६२–२९·१%, १९६२–६७–२७·४%, १९६७–७१–३०·६%, १९७१–७७–३३·२%, १९७७–७९–३६% हे लोकसभेतील प्रतिनिधित्वाचे प्रमाण पाहिल्यावर सहज स्पष्ट व्हावे चित्र. गेल्या साऱ्या काळात, या जमाती काँग्रेस पक्षापासून दिवसेंदिवस दुरावतच गेल्या. कारण काँग्रेस उच्चभ्रूंच्या हितरक्षणाच्या काळजीतच व्यग्र होती.

बिहार व उत्तर प्रदेशातील मुसलमान व हरिजनांची मते विभागली जाण्यातच श्रीमती गांधीना खरा धोका आहे. विहारमध्ये, आपल्या मुख्य मंत्रिपदाच्या कारकीर्दीत कर्पूरी ठाकुरांनी मुस्लिमां-

मधील मागासवर्गीय आणि हरिजनांमधील काही-भाग आपल्याकडे जिंकून घेतलेले आहेत, त्यांच्या धोरणी हालचालींनी. त्यांच्या युतीने २० टक्के हरिजन व २५ टक्के मुसलमानांचा पाठिंबा जरी मिळवता आला तरी ५४ पैकी निदान २५ जागा तरी जिंकतील ते सहज. बिहारमधील परिस्थिती अधिक चिंतनीय होण्याचे आणखी एक कारण म्हणजे श्रीमती गांधींनी जगजीवन बाबूंच्या पंतप्रधानपदाच्या वाटचालीत घातलेला अडसर. त्यामुळे बाबूजींना साऱ्या देशातील हरिजनांची– विशेषत. चांभार जमातीची सहानुभूती मिळाली. त्यामुळे, जगजीवनरामांच्या पक्षाने उत्तर भारतातील हरिजनांच्या मतांवर लक्षात येण्यासारखे आक्रमण केलेच तर श्रीमती गांधींच्या संभाव्य यशावर त्याचा प्रतिकूल परिणाम झाल्यावाचून राहणार नाही. तीच गत मुसलमान मतांची. त्यांची भूमिका अतिशय निर्णायक ठरेल. ज्या राम सुंदरदास मंत्रिमंडळाचा बचाव करण्यासाठी त्यांचा पक्ष पुढे सरसावला त्याच मंत्रिमंडळावर एकाएकी टीकेचे आसूड ओढले त्यांनी. त्यामागचे इंगित असे होते की, त्यांच्या कृतीवर राज्यातील मुस्लिम बांधव रागावलेले दिसले त्यांना. तिकडे जमशेदपुरात पुन्हा दंगल उसळली. जनसंघ घटक असलेल्या सरकारला पाठिंबा व्यक्त करता करता रा. स्व. संघावर दोष ठेवणे कसे जमणार ? एक गठ्ठा मतांचे दान करणाऱ्या समाजाची इतराजी ओढवून घेणे मूर्खपणाचे आहे हे ओळखण्याइतके शहाणपण श्रीमती इंदिरा गांधीनामक राजकारणी स्त्रीपाशी नक्कीच आहे.

अशा तऱ्हेने आपण मांडलेल्या निष्पक्षपाती गणितातून येणाऱ्या उत्तराने 'बाईंच्या पुनरागमनाचे' डिंडिम जोरजोरात बडवणाऱ्या महाभागांच्या उत्साहावर पाणी पडल्याशिवाय राहणार नाही. म्हणून सावधान !

आता राजकारणात या 'नाही' ला अस्तित्वच नसते ही गोष्ट तितकीच सत्य आहे. विशेषत: आजच्या घटकेला भारतात चाललेल्या राजकीय घडामोडी भलत्याच विचित्र आहेत. आपण वर पाहिल्याप्रमाणे श्रीमती गांधी निर्विवाद बहुमत मिळवण्याचा संभवच कमी असला तरी सत्ताप्राप्तीसाठी करावयाच्या साऱ्या लटपटी त्या करू शकतात. त्या क्षेत्रातील त्यांचा अनुभव, त्यांची कार्यक्षमता, त्यांची हातोटी निःसंशय विनतोड आहे. त्यांच्याभोवती पसरलेल्या श्रद्धाहीन व तत्त्वहीन वातावरणाचा उपयोग कसा करून घ्यायचा याची कला त्यांना अवगत आहे. एकच गोष्ट त्यांना सतावत असेल. त्या व त्यांचा सुपुत्र कशाचे प्रतीक आहेत, त्या दोघांनी या देशासाठी यापूर्वी काय केलेले आहे व जर त्यांनी पुन्हा सत्ता संपादन केली तर ती दोघे काय करतील याची आठवण जनतेला आहे. सर्वांत महत्त्व आहे ते याच वस्तुस्थितीला !

न्यायमूर्ती शहांच्या अहवालातील पानापानावर श्रीमती गांधी व त्यांचे चिरंजीव संजय गांधी यांनी पालन केलेल्या 'राजनैतिक रीतीभाती व तत्त्वनिष्ठा' (?) यांचे चिरंतन स्मारक उभे असल्याचे आढळेल. जिज्ञासूंनी त्याचे परिशीलन करावे.

अर्थात, श्रीमती इंदिरा गांधी आपल्याला आवर्जून सांगतील, 'मी व माझ्या मुलाने जे काही केले ते सारे या देशातील दीनदुबळ्या दलित जनतेच्या व राष्ट्राच्या कल्याणासाठीच केले !' आपला विश्वासही बसेल त्यांच्या त्या शब्दावर.

श्रीमती गांधींची धिटाई ही की, शहा-आयोगापुढे केलेल्या निवेदनात त्यांनी चक्क सांगून टाकले की, 'आणीबाणी जाहीर होण्यापूर्वी देशात आढळणारी परिस्थिती १९५८ साली फ्रान्समध्ये जनरल द गॉल सत्तेवर येण्याआधीच्या स्थितीशी जुळणारी अशीच होती.' त्यांचे साहित्यिक दलाल आताच लिहून मोकळे होत आहेत– तशीच परिस्थिती पुन्हा निर्माण झालेली आहे. इंदिरा गांधी जनरल द गॉलपेक्षा चाणाक्ष असून परिस्थितीला योग्य वळणावर पोहोचवण्याची ताकद केवळ त्यांच्यातच आहे असा डांगोरा पिटविण्याची व्यवस्था झालेली आहे.

श्रीमती इंदिरा गांधीनामक राजकारणी महिलेचे वर्णन कोणत्या शब्दात करता येईल एखाद्याला ?

त्यांचे नाव जुलमशहांच्या यादीत समाविष्ट करणे हा वादाचा मुद्दा होऊ शकेल. कारण जुलूमशहा या शब्दाची एक व्याख्या आहे– 'त्याच्या कालखंडात आणि समाजात प्रचलित असलेले कायदे, रूढी, आदर्श यांनी घालून दिलेल्या मर्यादांचे उल्लंघन करून सत्ता गाजवणारा आणि तसे करताना ती सत्ता टिकविण्याचा किंवा तिची वाढ करणारा राज्यकर्ता !' श्रीमती गांधींना ही टोपी फिट्ट बसते.

पण आपल्या कृत्याबद्दल एकदाही त्यांनी कसलाही पश्चात्ताप व्यक्त केलेला नाही. त्याऐवजी शक्य तितक्या तातडीने आपण व संजय यांच्याविरुद्ध शहा-आयोगाने काढलेल्या निष्कर्षांना 'राजकीय प्रचारमूलक' म्हणून त्यांची संभावना केली. त्याहीपेक्षा वाईट म्हणजे, जर पुनरपि सत्तेवर आलो तर आपण कोणालाही सूडबुद्धीने वागवणार नाही; शत्रू असो वा मित्र असो आपण दोघानाही समंजसपणाने व मायेनेच वागवू असे सांगत फिरताहेत त्या–अनुग्रहच देताहेत असे वाटावे कोणालाही. केवढी दयाशीलता वसते आहे त्यांच्या ठायी ! केवढा सुंदर आदर्श आहे हा सच्चा लोकशाहीवादाचा !

ॲडॉल्फ हिटलर सांगून गेला होता एकदा–'कोणतेही राष्ट्र आपली जीभ दुसऱ्यांदा भाजून घेण्याची चूक करत नाही. हॅमेलीनच्या पुंगीवाल्याची युक्ती लोकांना एकदाच फसवते !' हिटलरच्या म्हणण्यात तथ्य होते अशी आशा करू या. ☐

**('इंदिरा गांधींची सत्ताभिलाषा'–मूळ लेखक : जनार्दन ठाकुर– अनुवाद : माधव मोर्डेकर. प्रकाशक : अजब पुस्तकालय, कोल्हापूर. या पुस्तकाचा समारोप. साभार पुनर्मुद्रित.)**

# दिल्ली दिनांक

अभय जांभेकर

**दिल्ली दि. १२ डिसेंबर :**

नुकतीच दिल्लीला थंडी पडायला लागलीये. त्यामुळे धुक्याची वगैरे सुरुवात झालेली नाही. मात्र गेल्ये कित्येक दिवस दिल्ली बुडाली होती राजकीय धुक्यात. समोरचा माणूस आपल्या पक्षातला आहे का दुसऱ्या पक्षातला आहे ह्याचाच पत्ता लागत नव्हता.

जगजीवन राम जनता पक्ष सोडून इंदिरा कॉंग्रेसमध्ये जाणार अशी बातमी पसरली आणि तिला भक्कम पाठबळ मिळाले बाबूजींच्या आजाराचे. जनतावाल्यांचे धाबे दणाणले आणि ह्या ठिकाणी उपयोगी पडला मोरारजीभाईंचा स्वभाव. त्यांनी बाबूजींना खडसावले आणि सरळ केले. जनता पक्षाने मोरारजींचे आभारच मानायला हवेत.

हळूहळू वातावरण स्वच्छ होतंय. धुरळा खाली बसायला लागला आहे. प्रत्येक पक्ष मतदारासमोर जाण्यासाठी शेवटची रंगरंगोटी करतोय.

सगळ्यात वाईट परिस्थिती सध्या आहे लोकदल आणि अरस कॉंग्रेस यांची. दोघांनीही स्वतंत्र जाहीरनामे प्रसिद्ध केलेत. युती जवळजवळ मोडलीच आहे. निदान सत्तेवर असल्याचा फायदा घेऊन काही जागा मिळतील ह्या उद्देशाने सर्वजण एकत्र आहेत. लोकदलाने एकूण तीनशेपेक्षा कमीच उमेदवार उभे केलेत. तर कॉंग्रेसने दोनशेपेक्षा कमी उमेदवार उभे केलेत. अर्थात कुठलाही राजकीय पंडित वरील दोन पक्षांना फारसे महत्त्व देत नाही. चरणसिंग, राजनारायण, मधू लिमये, जॉर्ज फर्नांडिस ह्यांच्यापैकी खुद्द दिल्लीत कोणीही सभा घेऊ शकत नाही. This election is going to be a waterloo of Lokdal, हे लक्षात आल्यावरच की काय चरणसिंग वगैरेंनी उत्तर प्रदेश विधानसभा विसर्जित करण्याचा डाव रचला होता. त्यामुळे लोकसभेबरोबर विधानसभेच्या निवडणुका घेऊन सर्व जातींना खूष करायचे. साधारणतः उत्तरप्रदेशातून ४० ते ५० जागा जिंकायच्या. अर्थात चरणसिंगांचा डाव फसला. एकूण काय तर निवडणुकांच्या आधीच चरणसिंगाच्या पायाखालची वाळू घसरायला लागलीये.

खरी लढत होणार आहे Cong.-I आणि जनतामध्ये. इंदिरा कॉंग्रेस ५२० जागा लढविणार आणि त्यांच्या उमेदवारामध्ये आतापासूनच मंत्रिपदाची चर्चा आणि स्पर्धा सुरू झालीये. अर्थात इंदिराजी वगळल्यास सध्या तरी त्यांच्या पक्षात कोणीही मान्यवर नेता नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिकीट वाटपाची पद्धत. तिकीट वाटपाच्या वेळी 'हे कोण बहुगुणा ?' असे उद्गार संजयने काढल्याचे सांगण्यात येते. साधारणतः ८० टक्के उमेदवार इंदिरा-संजय पसंतीचे. त्यात संजयवर विश्वास असणारे जास्तीत जास्त उमेदवार असतील ही सोय इंदिराजींनी करून ठेवली आहे आणि बाईंनी धूर्तपणे भावीकालाच्या राजकारणाची आखणी सुरू केलीये. उ. प्रदेशात कमलापती त्रिपाठींना शह देण्यासाठी बहुगुणाची नेमणूक तर आध्रमध्ये ब्रह्मानंद रेड्डींना पाठिंबा. आश्चर्याची गोष्ट म्हणजे शाही इमामाशी समझोता झाल्यावर इंदिराजी पुन्हा त्यांच्याकडे फिरकल्यापण नाहीत. त्यामुळे शाही इमाम चिडले होते. मात्र बाईंनी त्याचा प्रसिद्धीसाठी खूप चांगला वापर केला. जामा मशिदीच्या भागातच शाही इमामांविरुद्ध भित्तीपत्रके लागायला लागलीत. आता बाईंनी हिंदूवर प्रभाव असणाऱ्या गुरूंना भेटायला सुरुवात केलीये. निदान उ. प्रदेशमध्ये प्रचंड प्रभाव असलेल्या जय गुरुदेव बाबानी बाईंना झिडकारून लावले. एकूण विचार करता राजकीय विचारवंतांच्या म्हणण्याप्रमाणे इंदिराजींना साधारणतः दोनशे ते दोनशेवीस जागा मिळतील आणि म्हणूनच का होईना बाईंनी निरनिराळ्या पक्षात आपली माणसे पेरायच्या दृष्टीने आतापासूनच प्रयत्न चालू केलाय. हो, ऐन वेळेस पंचाईत नको.

शेवटी राहिला जनता पक्ष बाबूजींना दिलेल्या तडाख्यातून नुकताच सावरला गेलेला, झुल्फिकार उल्ला याच्या पाठिंब्यामुळे मूठभर मास पण चढलेला असा हा पक्ष आता पूर्ण तयारीनिशी उभा राहतोय. जनता पक्षाची स्थिती पहिल्यांदा वाटली होती तेवढी काही वाईट नाही. जनता पक्ष जवळजवळ ४३५ जागा लढवतोय. उत्तरेत जनता पक्षाच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांना मिळालेल्या 'गुरुदेवबाबाचा' पाठिंबा. अर्थात त्याच बरोबर बाबूजींची दोलायमान स्थिती, चंद्रशेखर आणि बाबूजी, तसेच जनसंघ नेत्यांची तिकीट वाटपावरून झालेली खडाजंगी, यामुळे ह्या पक्षाची प्रतिमा डागाळली गेली आहे. त्याचप्रमाणे जवळजवळ ५ ते ६ राज्ये ताब्यात असल्याने पैशाच्या दृष्टीने जनता पक्षाची स्थिती मजबूत आहे. बरोबरीला शिस्तबद्ध प्रचारकांची फळी आहेच. दक्षिणेत इंदिराजींचा प्रभाव कमी झाल्याच्या बातम्या आहेत. त्यामुळे जनता पक्षामध्ये उत्साहाचे वारे संचारले आहे. राजकीय निरीक्षकांच्या मते जनता पक्षाला साधारणत. इंदिरा कॉंग्रेसएवढ्याच म्हणजे २०० ते २३० जागा मिळतील.

इतर प्रादेशिक पक्षांचा दिल्लीत विचारच नसतो. विचार झालाच तर वरील तीन पक्षांच्या आनुषंगाने एवढे मात्र निश्चित. ही निवडणूक काहीच निश्चित सांगणार नाही. कुठल्याही एकाच पक्षाला बहुमत मिळणार नाही. जनता पक्ष खेळतोय हरिजन मतावर तर इंदिरा गांधी मुस्लिम मतावर. त्याचप्रमाणे काहीही करून मागासलेल्या जातींची मते मिळविण्यासाठी लोकदल+कॉंग्रेसचा प्रयत्न चालू आहे. त्यांचा पाया आहे जाट मतदार. आणि ह्यापुढचे सर्व अंदाज उभे आहेत ते जातीच्या आधारावर, सर्व डावपेच आखले जाताहेत ते जातीच्या पायावर.

शेवटचेच : आमच्या हॉटेलबॉयला परवा मी सहज विचारले जगजीवनराम आले तर काय होईल ? तो म्हणाला, 'साहेब ह्या देशात क्रांती होईल.' 'कशामुळे ?' माझा प्रश्न. 'साहेब आम्ही ठाकुर लोक, जगजीवन राम चांभार. आम्ही काय चांभाराच्या हाताखाली काम करणार ?' त्याचे उत्तर. □

## दिल्ली : दि. १३ डिसेंबर

थंड दिल्ली हळूहळू तापायला लागलीय. पोस्टर वॉर केव्हाच सुरू झालीय. पोस्टरवॉर बघायचे असेल तर दिल्लीलाच बघायला मिळते. ह्याबद्दल नंतर केव्हातरी निवडणूक मात्र अंगात भिनायला लागलीय. वातावरण तापायला लागलंय.

इंदिरा कॉंग्रेसच्या प्रचाराची झलक आज बघायला मिळाली. नवी दिल्लीच्या जागेसाठी लढत आहे, इंदिरा कॉंग्रेसचे पुढारी, विरोधी पक्षनेते सी. एम. स्टिफन आणि जनताचे अटल बिहारी वाजपेयी यांच्यात. तसेच लोकदलाचे राजेंद्र पुरीपण उभे आहेत. अर्थात खरी लढत इंदिरा आणि जनतामध्ये आहे. लोक असं म्हणतात, स्टिफन यांची ब्याद टाळण्यासाठी त्याना अटलबिहारीविरुद्ध उभे केलेय.

भगतसिंह मार्केटमधून आज स्टिफन याची मिरवणूक होती. मुख्य घोषणा 'देश बचावो इंदिरा लाओ' इंदिरा गांधीचे प्रचंड भित्तीपत्रक जीपच्या समोर. मिरवणुकीत साधारणत: २५ ते ३० जण सामील झाले होते. स्टिफन यांचा खाक्याच विचित्र आहे. त्यांना हिन्दी बोलता येत नाही. ते भाषण करतात इंग्रजीतून. त्यांच्या बरोबरीचा माणूस लगेच त्याचे भाषातर करून सांगतो. त्याच्या भाषणाचे सूत्र–

'We may purchase a land, may get power connection, can install very good machinery; but if we do not have good manager how we are going to produce the product ? This country requires good manager. Indiraji is a good manager. Therefore vote Indira Congress to save the country'

त्यातूनच एकजण ओरडला,

'That means bring Sanjay & mismanage the country properly.'

एका रिक्शावाल्याला ह्या निवडणुकीत कोण येणार म्हणून विचारले असता तो म्हणाला,

'इंदिराजी अत्यंत लोकप्रिय आहेत. त्या स्वत. उभ्या राहिल्या तर मी त्याना मत देईन पण त्याचा कुठलाही माणूस उभा राहिला तर मी मत देणार नाही.' जवळजवळ हीच गोष्ट सर्व ठिकाणी आहे. जनतावाल्यानी खरं तर इंदिरा गांधीचे आभारच मानायला हवेत. जवळजवळ ५० ते ६० टक्के जागा संजय आणि इंदिरेच्या खास लोकाना दिल्या गेल्यात, ज्यांच्याबद्दल लोकाच्या मनात आशंका आहे, अप्रीती आहे, त्यामुळे इंदिरा वजा इंदिरा कॉंग्रेस = शून्य हे सूत्र पक्के आहे.

आणि म्हणूनच जनता पक्षाचा डाव इंदिराजीना त्यांच्या मतदारसंघातच गुतवून ठेवण्याचा असणार आहे, ज्यायोगे त्या सर्व दूर संचार करू शकणार नाहीत. त्यादृष्टीने रायबरेलीत विजयारा जे शिंदेंना उभे केले आहे, माताजीच्या विरोधात.

□

## दिल्ली : दि. १५ डिसेंबर

परवा लोकदलाच्या कार्यकर्त्यांच्या सम्मेलनाला गेलो होतो. मधु लिमयेंच्या मतदारसंघातले दोन कार्यकर्ते गप्पा मारत होते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मधु लिमयेंना किमान त्याच्या मतदारसंघात तरी संघाबद्दलची strategy बदलावी लागणार. त्याच्या सहकाऱ्यांनी त्यांना सल्ला दिलाय की, त्यानी संघावर आरोप करणे थांबवावे किंवा आरोप करायचाच असेल तर संघाला व्यापारी लोकांचा पक्ष म्हणावे. पण कोणत्याही परिस्थितीत Hindoo Communal Party म्हणू नये.

देशाच्या निरनिराळ्या भागात मक्केच्या प्रश्नावरून झालेले दंगे, हैद्राबादमध्ये मुस्लिम पुढाऱ्याना दिलेली आश्वासने पाळली नाहीत म्हणून झालेले दंगे, तसेच शाही इमाम यानी घातलेल्या आणि इदिराजीनी मान्य केलेल्या अटी यानी हिंदु समाजाला हादरा बसलाय. निदान हिंदू समाजच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला आपला रक्षणकर्ता मानतो, आणि म्हणूनच संघाला शिव्या म्हणजे हिंदू समाजाला शिव्या असे समीकरण होऊ घातलंय. स्वत: बाईंनी त्याची चाल बदलली आहे. इंदिरा कॉंग्रेसच्या जाहीरनाम्यात संघाला फारच कमी शिव्या दिल्यात. सभेत राष्ट्रीय संघाला शिव्या घालण्याचे बाई शक्यतो टाळतात. ही घटना आनंदकारक म्हणायची का हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे.

इंदिराजी परवा जयगुरुदेव बाबाना भेटल्या. अगदी नम्र होऊन. जयगुरुदेव बाबाना आणीबाणीमध्ये स्थानबद्ध केले होते. त्याबद्दल क्षमा मागून इंदिराजीनी त्याचा पाठिंबा मागितला. बाबानी इंदिरा गाधीना आणीबाणीच्या अत्याचाराबद्दल विचारताच 'त्याला जबाबदार बहुगुणा होते. त्यावेळेस ते मुख्य मंत्री होते' असे उत्तर दिल्याचे सागतात. पुन्हा बाबानी विचारले, ते आता तर तुमच्या पक्षात आहेत ! त्यावर इदिराजी उत्तरल्या 'आजतरी ते माझ्या पक्षात आहेत, उद्या निवडणुका झाल्यावर कुठल्या पक्षात जातील माहीत नाही.' बाबांनी पाठिंबा द्यायचं नाकारलं आज तरी. आणि इंदिरा, संजयसमोर काजवे चमकायला लागलेत. कारण बाबाना मानणारे अनेक अनुयायी त्या दोघाच्या मतदानसघातून आहेत.

जनता पक्षाबद्दल अजूनही लोकाना सहानुभूती आहे. लोक ती तशी व्यक्त पण करतात. जगजीवन राम, अटलबिहारी, मोरारजीभाईंच्या दौऱ्याना, सभाना चागलाच प्रतिसाद मिळतोय. जनता पक्षाचा जोर भित्ती पत्रकावर कमी आहे. प्रत्येक वर्तमानपत्रातून प्रचंड जाहिराती दिलेल्या आहेत. चंद्रशेखर याना त्याबद्दल विचारले असता त्यानी सागितले, 'शहरी सुशिक्षित भागातल्या लोकाकरिता ह्या जाहिरातीचा उपयोग होईल.' अर्थातच ह्याचा खर्च कोण करतंय, कुणालाही माहीत नाही.

चंद्रशेखर महाराष्ट्राची यादी पूर्ण करायची अर्धवट सोडून बाबा जयगुरुदेव याना भेटले होते. त्यानी जनता पक्षाला पाठिंबा दिलाय असे सागतात. जगजीवन राम याना जनता पक्षात राखण्याचे काही श्रेय बाबाना जाते.

हे सर्व असूनसुद्धा ज्याच्यासाठी हे करायचे तो मतदार अजूनही कवचात आहे. ऐतिहासिक काळी म्हणे आपल्या शेताच्या बाजूला लढाई चालू असताना शेतकरी शेत नागरत असे. कोणीही आला तरी त्याचे काहीच बिघडणार नव्हते. आताच्या मतदाराची भूमिका तीच आहे. ह्यावरून काही दिवसापूर्वी असाच फिरत असताना सुचलेल्या ओळी लिहाव्याशा वाटतात–

आमचा पराभव आम्ही विजय मानत आलो.
आमचा विजय आम्हाला कळलाच नाही.
कधी स्वार झालो गाधी, नेहरू लाटेवर
कधी स्वार झालो इंदिरा लाटेवर
आमची गरिबी कधी हटलीच नाही
जनता लाटेने मात्र दगाच दिला
लाटा निर्माण केल्या आम्ही, संपवल्या आम्ही
आमचा विजय, पराजय आम्हाला कळलाच नाही.

□

## दिल्ली दि. १८ डिसेंबर

दिल्ली खरोखरच थंड व्हायला लागलीये. कडाक्याच्या थडीबरोबरच झोंबणारे वारे वातावरण गार करायला मदत करताहेत. संध्याकाळी ५–०० वाजता अंधार पडायला लागतो. अर्थात वाढत्या थंडीबरोबरच निवडणूक प्रचारची गती वाढायला लागलीये. गेल्या तीन चार दिवसांत इंदिरा गाधी आणि अटलबिहारी वाजपेयी यांनी वातावरण ढवळून काढलंय. अटलबिहारीचे T. V. वर झालेले भाषण खूपच गाजलं. परिणामकारक ठरलंय. या निवडणुकीचा इंदिरा गाधीवर मनस्वी ताण पडतोय. इंदिरा कॉंग्रेसकडे इंदिराजींशिवाय इतर कुठलाही आकर्षक मुद्दा नाही.

नुकताच चंडिगढला जाऊन आलो. चडिगढला श्री. कृष्णकान्त जनतापक्षाच्या तिकिटावर उभे आहेत. तर श्री. कौशल कॉंग्रेस (इं) च्या तिकिटावर. अंबिका सोनी कॉंग्रेस (अ)कडून उभ्या आहेत. आणि अपक्ष म्हणून उभे आहेत रामस्वरूप शर्मा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मोठे माजी जनसंघ नेते. झुजीचे सर्व स्वरूपच पालटून गेले आहे तीन पक्षाच्या लढाईत शर्मांचा विजय होण्याची दाट शक्यता आहे.

अजूनही जनताचे कार्यकर्ते defence वरच आहेत. इंदिरा गाधीचा पक्ष मात्र आक्रमक भूमिकेने निवडणुकीत प्रचार करत आहे. अर्थात इंदिरा गांधीकडे पैसा पण भरपूर आहे. सर्वांत जास्त रंगीत भित्ती पत्रके त्याचीच आहेत, सर्वा । जास्त गाड्या त्यांच्याच फिरतात. उमेदवार निवडताना निवडणुकीसाठी किती पैसा देऊ शकेल हा महत्त्वाचा Criteria ठेवला होता आणि उद्योगपती पण इंदिराजीच्या बाजूने आहेत. इंदिरा गाधीनी उद्योगपतीना पूर्ण स्वातंत्र्य देण्याचे मान्य केले आहे. उद्योगपतीनी आपल्या थैल्या मोकळ्या केल्या. त्याचप्रमाणे लोकदलाने साखरेची Policy बदलून कोटयवधी रुपये साखर कारखानदारांकडून उकळले आहेत. यावर जोरदार चर्चा या ठिकाणी चालू आहे.

दिल्लीच्या प्रत्येक Traders Association ची निवडणुक समिती प्रत्येक व्यापाऱ्याकडून पैसे गोळा करते आणि राजकीय पक्षांना वाटते. अर्थात हा पैसा काळ्या पैशाच्या स्वरूपात दिला जातो.

पैसे जमविण्याचे व्यवहार येथेच थाबलेले नाहीत. परदेशी पैसा पण घुमाकूळ घालायला लागला आहे. परवाच राजनारायण यांनी मागणी केली होती की, इतक्या जुन्या नोटा चलनात ज्या येताहेत त्याची चौकशी व्हावी. ह्या वेळेस खूपसा पैसा येतोय ' तो अरब देश आणि रशियाकडून. प्रत्येक देश आपल्या परीने याला मदत करतोच. ह्या पैशातल्या ९०% भाग इंदिरा कॉंग्रेस आणि इतर मुस्लिम संघटनांना वा कम्युनिस्टाना मिळाला आहे. Multinational Companies तर पाण्यासारखा पैसा खर्च करताहेत. चरणसिंग नावाच्या इंदिराजींच्या एका उमेदवाराने Coca Cola पुन्हा सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे. हाच माणूस पूर्वी Coca Cola चे उत्पादन करायचा. जनता पक्षाला मात्र ह्यातले काहीच मिळाले नाही, कारण त्यांच्यामध्ये असलेला जनसंघ घटक पक्ष. अरब देशांपैकी एका राजदूताने एका Party मध्ये सागितल्याचे म्हटले जाते की, ' We will see that Jansangh will not come in power in any form in India ' कदाचित ह्याच कारणानी जनताला पैसा कमी पडत असावा. □


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे
मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# तो बापडा !

## ( अर्थात तुम्ही आम्ही )

अविनाश धर्माधिकारी

एक सभागृह. गच्च भरलेलं.

त्यात जो तो आपल्याच पद्धतीने आपल्याच तंद्रीत बसला होता. चार-दोन जणाची टोळकी क्वचित आत तोंडे वळवून काही चर्चा करताना दिसत होती.

मधूनच कसली गडबड झाली तरच ते एकत्र येत-एकसंध बनत-अन्यथा जो तो आपल्याच बाकड्यावर आपल्या पुस्तकात डोके खुपसून बसे. आपल्या सिद्धान्ताची विश्वव्यापकता शेजाऱ्याला समजावून सांगे.

कुजबुज, विस्कळितपणा. बेशिस्त...म्हणजे हे सभागृह.

तसे सगळे शिकलेले होते. झबल्याच्या कॉलरी पाढऱ्या असलेले होते. याची बुद्धी भेदक होती; पण भेद एकमेकांचा होत होता. गरगर फिरणारे पंखे...गरम झुळूक...उघड्या खिडक्या आणि आपल्या चौकटीत बांधलेल्या जनाचे हे सभागृह.

सभागृहाबाहेर एक जग होते.

हे त्यांना कुठे माहीत होते ? (खरं तर ते त्याचेच प्रतिनिधी होते.

त्यांची क्राती भिंतीच्या आतली.

त्याच्या सुधारणा बाकड्यावरल्या.

त्यांच्या चर्चा, गप्पा, सभा, निवेदने, परिसंवाद...

सारे सारे सभागृहबद्ध. फक्त सभागृहाकरिता म्हणजे स्वार्थाकरता.

या बाहेरच्या जगातून एक बापडा आत डोकावून पहात होता आपले सगळे विद्वान. आपण हे असे फटिंग. त्याच्या नजरेत आस होती. कौतुक होते. आदर होता. त्यांच्या तीक्ष्ण बुद्धीबद्दल एका कोपऱ्यात भीतीही होती.

त्यापुढे आपण कसले ? फाटके, मळकट.

बकाल...विसकटलेले...अशिक्षित.. असभ्य.

शिवाय गरीब.

त्याच्या एका डोळ्यात अपेक्षाही होती. सभागृहात चाललेल्या सर्व मंथनातून काही तरी नर्माण होईल. तापल्या हवेवर हलकेच तरंगत ते बाहेर येईल. मग कदाचित आपले जग बदलून जाईल.

खूप काळ गेला.

आतली गडबड वाढली की, त्यांच्या अपेक्षा वाढत. अगदी टाचा उंचावून खिडकीतून तो आत पहायचा. बाहेर कोणी येतंय का ? आमच्यासाठी काही घेऊन ?—गोंधळ यथावकाश शमायचा.

त्याचे विश्लेषण...परीक्षण...परिसंवाद...

ठराव=पत्रकारपरिषदा...स्नेहभोजने पुढे चालू

पण सगळे वांझोटे. नैष्कर्म्यसम्पन्न शून्य. त्याच्या चर्चांनी सभागृहातले पंखेसुद्धा कुरकुरायचे. थाबायचे नाहीत.

लक्षात यायला त्याला फार वेळ लागला की, याना मुळी करायचे काही नाहीच. आहे हेच छान आहे. सभागृहाची दारे बंद आहेत. चर्चा जारी आहे. त्या ऐकणारे सुजाण नागरिक, प्रेक्षाकक्षात चॉकलेट चघळीत आहेत. सर्व काही प्रस्थापित आहे.

बाहेर फार तंग आहे त्याचे काय !

त्याच्या अपेक्षाचा पाया हादरून निघाला. नजरेतील कौतुक ओसरले. हे शक्य आहे ? विचारवंत, बुद्धिवंत, श्रीमंत...स्वतःतच सवदे बांधलेले ? लडबडलेले ?

आपला पायजमा त्याने नीट बांधला. मळकट सदऱ्यावरून एकदा हात फिरवला. चालत दारापाशी आला. हळूच जात शिरला.

बिचकत बिचकत सभागृहात त्याने फिरायला सुरुवात केली. जाड पुस्तकात डोळे घातलेला एक. हनवटीवर लेखणी टेकवून विश्वाचा वेध घेण्याच्या आवेशात फक्त तुळयांकडे पाहणारा दुसरा आत्मोद्धता तिसरा, आत्मरत चौथा, पाचवा, सहावा सातवा...असे एकाडे

मग गटाने बसलेले काही. गटाची संख्या वाढती होती. त्यांचा विचारविनिमय चालू होता. आपल्या अपेक्षाची माळ कुणाच्या गळ्यात घालावी म्हणून विचार करीत तो पुढे सरकत होता-एका ठिकाणी 'समाज...राष्ट्र...निष्ठा.' हे शब्द त्याच्या कानावर पडले. तो थांबला. म्हटला, 'जरा माझे ऐकता का ? '...त्यांच्याकडे लक्ष द्यायला कुणाला वेळ नव्हता.

दुसऱ्या ठिकाणी त्याला 'मजूर...बोनस समता, दलितांची हुकूमशाही ! हे शब्द त्याला जास्तीच आशादायी वाटले. तो म्हटला 'मी त्यांचाच प्रतिनिधी आहे.' चटकन उत्तर आले, 'पण आमची गणिते वेगळी आहेत.'

अशी उत्तरे.

त्याच्या बकाल रूपाकडे पाहून कित्येकांनी तर सरळ हुडूत केले.

असे कितीक.

तो हताश झाला.

स्वतः गर्क असलेली कुजबुज अखंड चालू होती. तो वैतागला. एका अचानक उद्‌भवलेल्या अखिल सभागृहीय परिसंवादाच्या निमित्ताने कुजबुज वाढली. खुर्च्यांची बरीच अदलाबदल झाली. आवाज झाले. व्यासपीठावर येणाऱ्या प्रत्येकाकडे सर्व लक्ष देत. आणि त्याला खाली खेचत. मग पुढचा...

'एकराष्ट्र. अविच्छिन्न अखंड समाज'

खेच त्याला खाली जातीयवादी झाला.

'भांडवलशाहीचा परिपोष. त्यातून सामन्याची हुकूमशाही.'

– असे काय ? त्याला विकत घ्या.

'लोकशाही विरोधी प्रवृत्तीला आवर.'

– हा सी. आय. ए. चा एजंट आहे.

समस्या किती आहेत ?

ऐक्य, संरक्षण, इंधन, दारिद्र्य रेषेखालील जीवन.

आर्थिक. सामाजिक.

सीमाप्रश्न, पाणी प्रश्न, अंतर्गत सुरक्षा प्रश्न.

– याचे काय ? याचे काय ? याचे काय ?

कुठे काय ?

काहीच नाही.

हवेत सगळे शब्द नाचून गेले. निकाली शून्य तीस वर्षांचे एक भले मोठे शून्य. त्यात बसलेले अक्कलशून्य !

तो चिडला.

झटकन् उभा राहिला. थकलेला चेहरा. विस्कटलेल्या केसांआडचे काळेभोर डोळे सगळ्यांवर रोखत ओरडला... 'मूर्ख आहात सगळे...'

आवेशात त्याची मूठ बाकावर आदळली. फळीच मोडून पडली.

सभागृहात एकदम शांतता पसरली. बऱ्याच काळाने इतके खरे शब्द ऐकायला आले.

एक क्षणच तो बिचकला. आपण हे काय बोलून गेलो ?

शांत, शरमलेला हा वर्ग पाहिला अन् त्याचा विश्वास जागा झाला. आपण म्हटलो ते खरे आहे.

सुचेल ते तो बोलत सुटला. खडक फोडून उसळी मारणाऱ्या निर्मळ झऱ्यासारखे... प्रवाही.. धारदार त्याचे शब्द. उत्स्फूर्त.

> 'कसल्या विश्वात रममाण आहात ? शब्दाचे कसले पोकळ, वांझ खेळ खेळत आहात ? तुमचे कामशून्य. तुमचे वाद, मत्सर, हेवेदावे आणि समाजविन्मुख महत्त्वाकांक्षा अगणित. स्वत:ला फसवीत आहात. दांभिक. मूर्ख.'

सभागृहभर आसुडाचे फटके कडाडू लागले. तोही आपले गरीब बकाल रूप विसरला. व्यासपीठावर आभारासाठी ठेवलेल्या पुष्पगुच्छावर पाय देऊन, दोन्ही हात कंबरेवर ठेवून बेदरकारपणे उभा राहिला.

> 'या सभागृहाची दारे ज्यांचे हात ठोठावित आहेत त्याच्याकडे लक्ष द्या. आज हे केले नाहीत तर उद्या त्याच मुष्टी तुमच्या शवपेटयांवर खिळे ठोकणारे हातोडे पेलतील.'

रांगडे त्याचे रूप त्याचे शब्द रांगडे. पण त्याच्या कपडयासारखे मातीचा स्पर्श असलेले. म्हणून चमकणारे. नागाच्या फण्यासारखे त्याचे ताठ, कणखर दर्शन. सारे सभागृह थक्क झाले

सगळया खुर्च्यांची तोंडे त्याच्या दिशेने वळली. पंखे थांबले. दारे सताड उघडली गेली. पुस्तके फटाफट बंद झाली. मने खुली झाली.

त्याला फार बोलता येत नव्हते असे नाही. पण शब्दाच्या मर्यादा आणि महत्त्वही तो जाणत होता. कृतीची आवश्यकता त्याला जाणवत होती.

तो सरळ चालत सभागृहाबाहेर पडला. त्याच्या पाठोपाठ एक दिंडी निघाली. तीन पावलात विश्वाला गवसणी घालण्यासाठी.

□




**लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# मुस्लिम मत कसा आकार धारण करील ?

## दोन मुलाखती

कोपऱ्यावरचा 'अमृततुल्य' भुवनाचा कोपरा ही निवात चर्चेला उत्तम जागा असते. आसपास बसलेले सर्व आपापल्या धुरात वेढलेले असतात. त्यामुळे काचेच्या खोलीतल्यापेक्षा इथे चर्चा जास्त शांतपणे होऊ शकते पाण्याचा पेला ठेवायला येणारा पोऱ्या आणि शाही इमाम, कॉंग्रेस (आय), अल्पसख्याक ई. शब्दानी दचकणारा एखादा चहावाला शेजारी सोडला तर बाकी एकांत असतो. सय्यद मुनीर यांची मुलाखत अशी झाली–

### श्री. सय्यद मुनीर, पत्रकार

श्री. सय्यद मुनीर हे दै. सकाळमध्ये पत्रकार आहेत. मुस्लिम सत्यशोधक चळवळीचे एक जागरूक घटक असल्याने, 'राजकारण आणि मुस्लिम मत' या विषयावर त्यांचा सखोल विचार झाल्याचे लक्षात येत होते. म्हणून त्याचे काही अंदाज सकृद्दर्शनी अनपेक्षित वाटले (उदा. बलराजमधोकं यांच्या पक्षाला उत्तर प्रदेशात अपेक्षेपेक्षा जास्त मते मिळतील) तरी त्याच्या पाठीशी अभ्यासातून आलेली तर्कशुद्धता होती.

१९७७ मध्ये मुसलमानाचा पाठिबा जनता पक्षाला मिळाला तो सहजपणे. शाही इमाम नसते तरी हा पाठिंबा मिळाला असता असं त्यानी सागितले आणि त्यानंतरच्या घडामोडीचा आढावा घेत मुस्लिम मताचा निवडणुकीत कसा सहभाग असेल त्यांचे स्वरूप उकलून दाखविले.

निवडणुका जाहीर झाल्यावर नोव्हेंबर महिन्यात लखनौ येथे एक परिषद झाली. सर्व पक्षातील सर्व मुस्लिमानी एकत्र येऊन एक आघाडी स्थापन करण्याचा निर्णय झाला. सध्याच्या विस्कळित राजकीय परिस्थितीचा फायदा घेऊन मुस्लिम मागण्या पुढे रेटण्याचे यात धोरण होते. ही जी आघाडी स्थापन झाली ती 'युनायटेड मुस्लिम फ्रंट' राखीव जागा, उर्दू, अलिगड विद्यापीठ याच या आघाडीच्या मागण्या आहेत. दि. ९ डिसेंबरच्या 'रेडिअस'च्या अंकात या मागण्या आल्या होत्या. रेडिअस हे जमाते इस्लामचे मुखपत्र आहे.

अर्थात नंतर ही आघाडी फुटली. मागण्या एकच असून पाठिंबा मात्र वेगवेगळया पक्षाना, असं का ? ही फ्रंट का फुटली ?

याची पार्श्वभूमीही मुनीर यानी स्पष्ट केली. त्यानी सागितले की, एकतर स्वत.च्या ताकदीवर ही आघाडी संपूर्ण देशातून फार तर पंधरा ते वीस खासदार निवडून आणू शकली असती. त्यातून फारसा प्रभावी गट संसदेत निर्माण झाला नसता. म्हणजेच कुठल्या तरी पक्षाला पाठिंबा देऊन सत्तेत भागिदारी प्राप्त करून घेणे, हे आवश्यक झाले आणि राजकीय अनिश्चितता अशी आहे की, निवडणुकीनंतर नेमका कोणता पक्ष सत्तेवर येईल हे सागता येत नाही. याच कारणामुळे आपली मोट कुठल्या पक्षाबरोबर जुळवावी याविषयी मतभेद होऊन फ्रंट फुटली.

सध्या विभागला गेलेला मुस्लिम पाठिंबा असा आहे :– शाही इमाम कॉंग्रेस (आय) बरोबर, मूळ युनायटेड मुस्लिम फ्रटचे अवशेष लोकदल, कॉंग्रेस (U) समवेत तर त्यातून फुटलेले झुल्फिकारूल्ला जनता पक्षाला पाठिंबा देत आहेत. या सगळयाचा देशातील मुस्लिम मतावर नेमका कसा परिणाम होईल ?

हे सागताना त्यानी असे मत व्यक्त केले की, नेहमी मुस्लिम मत जे गठ्ठयाने जाते तसे न होता वेगवेगळया भागात वेगवेगळया पक्षाना मुस्लिम मते मिळू शकतील. या मतांवर कुणाकुणाची हुकमत आहे आणि त्यातून या मताची गणिते कशी माडली जातील हे त्यानी सागितले–

आताच्या चित्रात शाही इमाम, इंदिरा गांधी, बहुगुणा आणि झुल्फिकारूल्ला हे चार मुस्लिम मताचे मुख्य 'दावेदार' आहेत, तूर्त यातले पहिले तिघे एकत्र असले तरी त्या प्रमाणात मताची विभागणी होणार नाही. कारण मताच्या राजकारणात शाही इमाम यांचा फारसा प्रभाव नाही. या उलट झुल्फिकारुल्ला आपल्या प्रभावाने उत्तर प्रदेशातील मुस्लिम मते 'जनता'च्या पाठीशी उभी करू शकतील. शिवाय शाही इमामांच्या मागण्यामुळे मोठ्या प्रमाणात हिंदुमत कॉंग्रेस (आय) विरुद्ध जाईल. (उत्तर प्रदेशात बलराज मधोकांच्या पक्षाला मते मिळतील हा मुद्दा असा आला होता) दुसऱ्या बाजूला कॉंग्रेस (आय) ने शाही इमामाच्या मागण्याचा नि.संदिग्ध स्वीकार केलेला नाही, त्यामुळे मुस्लिम मत सशयात पडू शकेल.

मुस्लिम मत कसे आकार घेईल या सदर्भात आणखी काही गोष्टीची नोद मुनीर यानी केली. दिल्लीतून हुजूम (गर्दी) या नावाचे उर्दू नियतकालिक प्रकाशित होते. अलिगढ विद्यापीठाचा विद्यार्थी नेता जावेद हबीब हा त्याचा सपादक आहे. डॉ. फरीदी याचा तो शिष्य आहे. जावेद हबीब हा प्रागतिक मताचा आहे. शाही इमामच्या मागण्याना आणि बहुगुणाच्या राजकारणाला त्याने कडाडून विरोध केला आहे. 'हुजूम'-मधून त्यान आपली तोफ डागली आहे. दुसरे म्हणजे मुस्लिम पक्षामध्ये गोंधळून गल्याची अवस्था आहे. ही भावना मुस्लिम मतदारापर्यंत उतरून मुस्लिम मत विभाजित होईल.

हे मताचे प्रवाह कसकसे वाहतील ?

त्याचे अदाज सय्यद मुनीर यानी सागितले. जास्त गठ्ठा कॉंग्रेस (आय)कडे जाईल

हे शक्य आहे. पण बिहारमध्ये कर्पूरी ठाकूर उत्तर प्रदेशाच्या पश्चिम भागात लोकदल, आसामात अरस कॉंग्रेस हे मुस्लिम मत मिळवतील. (अर्थात आसाम निवडणुकाचा तूर्त फारसा प्रश्न नाही.) त्याच्या मते सर्वच मुस्लिम मताचे स्वरूप नकारात्मक असेल. डोळयावर येतील एवढया जातीय दंगली जनता राजवटीत झाल्या, म्हणून जनता पक्षाविरुद्ध इंदिरा गांधींचे मुस्लिम विषयक धोरण तोंडाने सहानुभूती दाखवायची, प्रत्यक्ष सवलती द्यायच्या नाहीत, असे असल्याने कॉंग्रेस (आय) विरुद्ध हा नकारात्मक मत याचा अर्थ.

मुस्लिम मताविषयीची चर्चा ओघानेच पुढे आलेल्या मागण्या, अल्प संख्याकाचा प्रश्न यावर आली. मुनीर यांच्या मते राजकीय उलाढालीद्वारे आपल्या मागण्या पुढे करणे हा खरा मार्ग नाही. उलट त्यातून जातीय तणाव वाढू शकतील. विशेषतः राखीव जागासंबंधीच्या मागण्या 'जातीय' आहेत. अल्पसंख्याकाचे प्रश्न सोडविण्याचे खरा मार्ग बहुसंख्यांकाचा विश्वास मिळविणे हा आहे. शिवाय पाठिंबा मिळविण्यासाठी पक्षानी या मागण्या मान्य केल्या असल्या तरी प्रत्यक्षात त्याची कार्यवाही होणार नाही. बहुधा याची जाणीव झुल्फिकारुल्ला यांना असावी. त्यामुळेच त्याचे एक विधान आहे की, 'आम्हाला बहुसंख्याकांचीही मते हवी आहेत.'

म्हणजे परत जातीयता आणि त्याचा फायदा मिळविण्यासाठी चालणारे पक्षीय राजकारण-मुस्लिम मताची निर्णायक सूत्रे झाले. सर्वसामान्य मुस्लिम मतदार गरीब आणि अशिक्षित असल्यामुळे ही सूत्रे कायम रहातात. पण ही स्थिती शंभर टक्के खरी आहे का?

तर नाही. हे त्याचे मत आहे. मुस्लिमातही आता सुशिक्षित आणि राजकीय दृष्टया जागरूक असलेला, जातीय नसलेला असा मतदार तयार होऊ लागला आहे. इतर मध्यमवर्गीयांप्रमाणेच तो शात असतो. त्याला परिस्थिती कळते पण तो बोलत नाही एवढेच. असा मतदार जसजसा निर्माण होत जाईल तसतशी मुस्लिम मतांची सूत्रे बदलतील. शिवाय आत्ताचे मुस्लिम नेतृत्व अशिक्षित आहे. हळूहळू हे नेतृत्व सुशिक्षित, प्रागतिक हातात जाईल. तेव्हाचे रूप वेगळे असेल. □

---

## प्रा. मुल्ला

---

प्राध्यापक मुल्ला हे गोखले अर्थशास्त्र संस्थेमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक आहेत. मुस्लिम मताच्या हालचालीविषयी त्याचा विशेष अभ्यास असल्याचे जाणवले.

सर्व सामान्य मुसलमान हा अशिक्षित, गरीब असल्यामुळे त्याची मते गठ्ठयाने जातात. मात्र त्यावर शाही इमामचा निर्णायक प्रभाव नसतो असे त्यानी सागितले. या संदर्भात त्यानी एक मुद्दा माडला की, मुळात शाही इमामना मुस्लिमांचा राजकीय नेता कुणी केले?

'इमाम' ही एक धार्मिक क्षेत्रातली व्यक्ती असते. प्रत्येक मशिदीचे 'पेश इमाम' असतात. भारतातील सर्वात मोठ्या मशिदीचा इमाम या नात्याने 'शाही इमाम' ना विशेष मान असतो. पण हे शाही इमाम बुखारीसाहेब हे राजकीय क्षेत्रात कसे आले? प्रा. मुल्ला यानी सागितले की, १९७७ च्या निवडणुकीत बाबूजीनी झियाउद्दिन बुखारी याना राजकीय स्थान निर्माण करून दिलं.

आता ते मुस्लिम मताचे 'अधिकृत प्रवक्ते' होऊन राहिलेत. शाही इमामना राजकीयदृष्टया उत्तर प्रदेशात पाठबळ असू शकेल असे मत त्यानी व्यक्त केले. उत्तर प्रदेशातूनच मशिदीची 'पेश इमाम', 'हाफिजे कुरान' तयार होतात. उत्तर प्रदेशात घडणाऱ्या राजकारणावरून देशातील मुस्लिम मताची दिशा निश्चित होते. उत्तर प्रदेशातल्याच राजकीय वाऱ्यावरून त्यानी असा अंदाज व्यक्त केला की, देशभरचे मुस्लिम मत एकाच पक्षाकडे जाईल असे दिसत नाही. स्थानिक नेतृत्वानुसार ते वेगवेगळ्या उमेदवाराच्या मागे जाऊ शकेल.

त्यानंतर चर्चा झाली ती मागण्यासंबंधी. शाही इमाम किंवा झुल्फिकारुल्ला यानी पाठिंबा जरी वेगवेगळया पक्षाना दिला असला तरी सादर केलेल्या मागण्या साधारण सारख्याच आहेत. केंद्रीय, राज्य मंत्रिमंडळ, पोलीसदल व सैन्य यात विशिष्ट टक्के राखीव जागा; उर्दू भाषेचं स्थान आणि अलीगड विद्यापीठाच्या अल्पसंख्याक रूपाचे पुनरुज्जीवन अशा प्रकारच्या या मागण्या आहेत.

या मागण्या 'जातीय' स्वरूपाच्या आहेत असे मत त्यांनी व्यक्त केले. राजकीय कारणासाठी, मतासाठी अशा मागण्या करणे व मान्यता देणे यातून उद्याचे तणाव निर्माण होऊ शकतील, अशी भीती त्यानी व्यक्त केली.

जनतापक्ष व सघ यासंबंधीच्या समजुतीमुळे मुस्लिम मत जनतापक्षापासून दूर जाईल का?

यावर प्रा. मुल्ला यानी सागितलं की, अल्पसंख्याकाची मते मिळविण्यासाठी इंदिरा गाधी यानी RSS चे भांडवल केले आहे.

हे राजकारण 'जातीय' आहे. राजकीय कारणासाठी त्याला खतपाणी घातले जाते. हे तर प्रत्येकजण म्हणतो,पण प्रश्न असा आहे की, हे थाबू शकेल का? आणि कसे?

या प्रश्नावर त्यानी सागितलं की, सध्याच्या राजकारणात तरी असा काही प्रवाह जाणवत नाही; पण या प्रश्नाचा निवडणुकीहून जास्त व्यापक संदर्भात विचार करायचा झाला तर प्रा. मुल्ला यानी दोन प्रकारचे कार्यक्रम सुचविले. एक : मुस्लिमांचे आर्थिक प्रश्न दूर करणे आणि दुसरा त्याचे शिक्षण इतर सर्वांच्या बरोबरीने करणे.

पण त्याहीपेक्षा हिंदु-मुसलमान जवळ आले तर 'जातीय' प्रश्नच उरणार नाही. श्री. एस. एम. जोशी याच्याबद्दल पुण्यातील मुसलमानात प्रेम आहे असे प्रा. मुल्ला यांनी सागितले. पुण्यातील मतावर याचा महत्वाचा परिणाम होऊ शकेल.

**—प्रतिनिधी**

# मराठी परिभाषा : एक आदर्श चर्चासत्र

प्रा. कल्याण काळे

या वर्षी राजभाषा वर्षाच्या निमित्ताने शासनातर्फे अनेक परिसंवाद आयोजित करण्यात आले. शासनातर्फे प्रकाशित होणाऱ्या लोकराज्य या मासिकाने निरनिराळ्या भाषात आपले विशेषांक प्रकाशित केले. अशासकीय स्तरावरही वर्तमानपत्रे आणि अन्य नियतकालिके यामधून निरनिराळ्या नामवंतांचे लेख प्रसिद्ध झाले. या परिसंवादातून, लेखातून महाराष्ट्र शासनाने केलेल्या परिभाषाविषयक कार्याचीच छाननी प्रामुख्याने होत असताना 'परिभाषा' या विषयावर स्वतंत्र चर्चासत्राची आवश्यकता काय होती? मॉडर्न महाविद्यालयाने या महिन्याच्या सुरुवातीला आयोजित केलेल्या 'मराठी परिभाषा चर्चासत्रा' च्या संदर्भात माझ्या मनात हा प्रश्न आला होता.

पण प्रत्यक्ष चर्चासत्राचा अनुभव घेतल्यानंतर मात्र या चर्चासत्राची विशेषता जाणवली. अशासकीय स्तरावर या विषयावर भरवण्यात आलेलं हे पहिलंच चर्चासत्र होतं. शासनाने भरवलेल्या परिसंवादांना व्याख्यानसत्राचं स्वरूप आलं होतं. या चर्चासत्रात मात्र निरनिराळ्या क्षेत्रातील अधिकारी एकत्र बसून परिभाषेसारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर चर्चा करत होते. हा योग या चर्चासत्रामुळेच आला होता. इतरत्र चर्चा होतात आणि लोक निघून जातात. पण इथे चर्चासत्राच्या शेवटी पुन्हा एकदा आढावा घेण्यात आला. एकमताने काही सूचना ठरावरूपाने संमत करण्यात आल्या. तसंच या चर्चासत्रात झालेली चर्चा बरीचशी मौलिक स्वरूपाची होती. या सर्व विशेषामुळेच या चर्चासत्राचं वेगळेपण आता जाणवतं आहे.

मॉडर्न महाविद्यालयाच्या शताब्दी उत्सवानिमित्त बापट स्मारक निधीतर्फे अशा प्रकारचं चर्चासत्र आयोजित करण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्यात आलं होतं. त्यामुळे या महाविद्यालयाने या चर्चासत्राची जबाबदारी घेतली आणि अतिशय समर्थपणे पार पाडली.

दि. १ डिसेंबरला ३ वाजता गं. बा. सरदारांच्या हस्ते या चर्चासत्राचं उद्घाटन झालं. याचवेळी बार्शी येथे भरणाऱ्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मॉडर्न महाविद्यालय, बापट स्मारकनिधीचे आणि महाराष्ट्र राज्य भाषा संचालनालय या तीन संस्थांच्या वतीने प्रा. सरदारांचा सत्कार करण्यात आला. चर्चासत्राचं औपचारिक उद्घाटन करून आपल्या सत्काराला उत्तर देताना प्रा. सरदार म्हणाले, 'केवळ सध्या असलेल्या तणावाला भिऊन अनेक लायक व्यक्ती या निवडणुकीपासून दूर राहिल्या. पण तणावाला भिऊन दूर राहण्याने प्रश्न सुटत नसतात. त्याना सामोरं जायलाच हवं. म्हणून मी निवडणूक लढवायचं ठरवलं. मला दोन्ही पक्षाचा पाठिंबा होता म्हणून निवडूनही आलो. दलितातर्फे मला बार्शीत पुणे किंवा चंद्रपूरची पुनरावृत्ती होणार नाही अशी हमीही देण्यात आली आहे. पण संघर्ष होणारच नाही असेही सांगता येत नाही म्हणून माझ्या उभय पक्षातील चाहत्यांनी मोठ्या संख्येने बार्शीला यावं असं आवाहन मी त्यांना करतो.'

### शासन व्यवहार व परिभाषा

यानंतर पहिलं चर्चासत्र सुरू झालं. त्याचं अध्यक्षस्थान प्रा. सरदाराच्याकडेच होतं. विषय होता 'शासन व्यवहार आणि मराठी परिभाषा' या चर्चासत्रात एकूण तीन निबंध वाचले गेले. भाषा संचालनालयाचे संचालक श्री. य. शं. कानिटकर यानी आपल्या निबंधात शासनाची परिभाषेसंबंधीची भूमिका स्पष्ट केली. श्री कानिटकर फार आग्रही आहेत असं बोलल जात होतं. पण या निबंधात त्यानी जे विचार मांडले ते खूप प्रांजळपणाचे वाटले श्री. कानिटकर या चर्चासत्रातील तिन्ही चर्चांना उपस्थित राहून चर्चेत भाग घेत होते. शासनाच्या सेवेत असूनही त्यांनी अभ्यासू वृत्ती आणि व्यासंग याची जपणूक केल्याचे स्पष्ट दिसत होते. शासनाची अनाग्रही भूमिका माडत असतानाच ते शासनावर केल्या जाणाऱ्या सवंग टीकेचा उपरोधपूर्ण शब्दात परामर्श घेत होते. या निबंधात आणि नंतर झालेल्या चर्चेतून व्यक्त झालेली कानिटकरांची भूमिका संकलितपणे अशी माडता येईल. शासनाच्या परिभाषेवर संस्कृतप्रचुर, अव्यवहार्य, बोजड असे आरोप सरसहा करण्यात येतात. काही शब्दाच्या बाबतीत ते खरेही असतील पण त्यामुळे सगळेच शब्द टाकाऊ ठरत नाहीत. काही शब्द मुद्दाम संस्कृतातून घेतले आहेत. कारण देशी भाषेतले त्याचे पर्याय संकुचित अर्थ व्यक्त करणारे होते. (उदा. कोंबड्याऐवजी कुक्कुट) काही बाबतीत देशी बोलीभाषात एकाच अर्थाचे वेगवेगळे शब्द रूढ असल्याने त्यापैकी एकही शब्द न घेता संस्कृत शब्द घ्यावा लागतो. (उदा. गुडघ्याऐवजी जानु) काही ठिकाणी देशी भाषेतील शब्दापासून समास बनवताना अथवा साधित शब्द बनवताना अडचणी येतात म्हणून संस्कृत पर्याय स्वीकारणे सोयीस्कर वाटले. तर काही वेळेला अखिल भारतीय पातळीवर व्यवहार करण्यासाठी समान परिभाषा असावी अशा सूचना असल्यामुळे देशी शब्द टाकून अन्य संस्कृत शब्द घेण्यात आले. (उदा. सचिव) काही ठिकाणी शासनाने न स्वीकारलेल्या शब्दावर ते शासनपुरस्कृत आहेत अशा समजुतीने टीका झाली आहे. तर काही वेळा केंद्रशासनाच्या हिंदी संज्ञाची महाराष्ट्र शासनाच्या संज्ञांशी गल्लत करून टीका झाली आहे. परिभाषा कठीण आहे

या आक्षेपातही काही अर्थ नाही. कारण अनेक ज्ञानविषय आपण नव्याने मराठीत आणत आहोत. त्याची परिभाषा कठीणच वाटणार. ही परिभाषा सामान्याना समजली पाहिजे म्हणून सोपी करा असा आग्रह धरणाऱ्यानी लक्षात ठेवावे की, असे करण्यात आपण सामान्यांबद्दल प्रेम दाखवत नसून त्यांच्या पात्रतेबद्दल संशय व्यक्त करत आहोत. सामान्यांना नवीन ज्ञान द्यायचे असेल तर त्याना ही नवी परिभाषासुद्धा शिकवलीच पाहिजे. शासनाने योग्य वाटले तेथे व्यवहारातले वा संस्कृतेतर भाषातले शब्दही स्वीकारले आहेत. त्याबाबतीत शासन मुळीच ताठर नाही आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे शासनाने प्रकाशित केलेली परिभाषा केवळ मार्गदर्शक स्वरूपाची आहे. कुणाला नवीन शब्द सुचत असल्यास तो वापरायची मुभा त्याला दिलेली आहे. श्री. कानिटकरांनी शासनाची बाजू समर्थपणे मांडली तरी या चर्चासत्रातही ते टीकेतून सुटू शकले नाहीत. अनेकानी त्यांच्यावर आक्षेपाची सरबत्ती केली. त्यांनीही त्याना समर्पक उत्तरं दिली. काही वेळ या चर्चासत्राला डॉ. अशोक केळकरानी म्हटल्याप्रमाणे विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासाचं स्वरूप आलं होतं. काही महत्त्वाचे आक्षेप असे : प्रा. हे. वि. इनामदार म्हणाले की, शासनाने परिभाषेच्या बाबतीत सक्तीच केली पाहिजे. अव्वल इंग्रजीत मेजर कँडी, मोल्स्वर्थ इ. इंग्रज अधिकाऱ्यांनी विशिष्ट भाषेचा आग्रह धरला म्हणून एक विशिष्ट शैली रूळली. तेव्हा आग्रहाशिवाय काही होत नाही. इनामदाराच्या या सूचनेला डॉ. प्र. चिं. शेजवलकरानी व श्री. प्रभाकर पाध्ये यांनी कडाडून विरोध केला. प्रा. दावतरांनी शासकीय परिभाषाकोश हे परिभाषाकोश नसून प्रतिशब्दांच्या याद्या आहेत असा आक्षेप घेतला. बऱ्याच वेळा पारिभाषिक नसलेल्या शब्दाचाही या याद्यात समावेश झाला आहे. मराठीची प्रकृती समासानुकूल नसताना या याद्यातून सामासिक शब्दाचा भरणा करण्यात आला आहे. त्याऐवजी मराठी पद्धतीचे शब्दसमूह वापरायला काय हरकत आहे? (उदा. मस्तिष्कविकार याऐवजी मेंदूचा रोग इ) साधे मराठी शब्द उपलब्ध असताना उगीचच संस्कृत पर्याय घेतले गेले आहेत. (उदा. 'मोठं आतडं' याऐवजी ब्रहदान्त्रक इ) डॉ. मु. श्री. कानडे याचा स्वतंत्र निबंध तर शासनाच्या परिभाषा कोशाची चिकित्सा करणाराच होता. निरनिराळ्या परिभाषा समित्यांनी एकाच शब्दासाठी वेगवेगळे पर्याय सुचवले आहेत. त्यांच्यात एकवाक्यता नाही असा त्याचा आक्षेप होता. व्यवहारात रूढ असलेल्या चागल्या शब्दाऐवजी विनाकारण कृत्रिम शब्द सुचवण्यात आले आहेत. (उदा. शृगापत्ती ऐवजी उभयापत्ती) काही विसंगत शब्द परिभाषेत समाविष्ट केले आहेत. (उदा. फोटोपोत) इ.

## वस्तुलक्षी व गुणलक्षी

या पहिल्या चर्चासत्रात सर्वात वैशिष्टय पूर्ण ठरलेला निबंध म्हणजे डॉ. अशोक केळकर यांचा. त्यांच्या निबंधाचा विषय होता 'परिभाषा घडविण्याची मार्गदर्शक तत्त्वे' परिभाषा या विषयाची तात्त्विक पातळीवरून त्यांनी केलेली चर्चा निश्चितच उद्बोधक ठरेल. परिभाषेसंबंधीचे गैरसमज प्रथम दूर करून त्यांनी भाषाव्यवहाराची तीन पातळीवर विभागणी केली. परिभाषासापेक्ष भाषाव्यवहार, व्यवहारसापेक्ष भाषाव्यवहार आणि शैली सापेक्ष भाषाव्यवहार. यामधे व्यवहारसापेक्ष भाषाव्यवहार काहीसा संकेताश्रित तर काहीसा संदर्भाश्रित असतो. परिभाषासापेक्ष भाषाव्यवहार हा केवळ सकेताश्रित असतो. आणि शैलीसापेक्ष भाषाव्यवहार हा ब्रव्हंशी संदर्भाश्रित असतो, असा या तिहीतील फरक ढोबळ मानाने सांगता येईल. पारिभाषिक संज्ञा आकाशातून पडत नाहीत. त्या व्यवहारातूनच घेतल्या जातात. त्यांचं शब्दरूप जसं निश्चित असतं तसं त्याचं अर्थरूपही निश्चितच असतं. ज्या चिन्हांकन प्रक्रियेने ती जोडली जातात तीही निश्चित असते. शब्दरूप-चिन्हांकन-अर्थरूप यांची साखळी तुटली की, श्रोता आणि वक्ता याचे दळणवळण तुटते. पारिभाषिक शब्दाच्या अर्थाच्या दृष्टीने दोन बाजू असतात. काही शब्दांनी केवळ वस्तुबोध होतो तर काही शब्दानी गुणबोध होतो. शब्दाच्या नुसत्या वस्तुरूपावरून केंद्रित होणाऱ्या काही संज्ञा असतात. तर काही त्याच्या संकल्पनेभोवती केंद्रित झालेल्या असतात. आधुनिक शिक्षणामधे बऱ्याच वेळा फक्त वस्तुरूपात्मक ज्ञान मिळवून परीक्षा उत्तीर्ण होतात. पण गुणरूप ज्ञान न मिळाल्यामुळे त्यांचं ज्ञान अपूर्णच रहातं. शिक्षणाच्या क्षेत्रातली ही फार मोठी खंत आहे. ती दूर करण्याचा प्रयत्न शिक्षकानीच केला पाहिजे. वस्तुलक्ष्मी आणि गुणलक्ष्मी दोन्ही प्रकारच्या परिभाषा आवश्यक असून त्याच्यात नवीन नवीन ज्ञानाच्या संदर्भात बदलही होत जातो. याच आपल्या निबंधात डॉ.केळकरानी परिभाषा निर्मितीची १८ सूत्रं दिली आहेत. तीही फार अभ्यासपूर्ण आहेत. जिज्ञासूनी हा निबंध मुळातूनच वाचला पाहिजे. निबंधाच्या या तात्त्विक व गहन स्वरूपामुळे त्यावर ताबडतोब प्रतिक्रिया व्यक्त झाल्या नाहीत. हे स्वाभाविकच होतं. अध्यक्षस्थानी असलेल्या प्रा. सरदारानी हे भाकित केलच होतं.

या पहिल्या चर्चासत्राचा समारोप करताना प्रा. सरदारांनी भाषासल्लागार मंडळाचे सदस्य या नात्याने शासनाच्या भूमिकेच समर्थन केलं. पण त्याबरोबर हेही सांगितलं की, परिभाषा शास्त्रशुद्ध आहे की नाही, हा प्रश्न नाही, तर जनसामान्यापर्यंत ती पोहोचते की नाही हा मुख्य प्रश्न आहे. जनसामान्यांच्या मनात जर संस्कृतबद्दल आकस असेल तर तो दूर करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत.

## मराठीबद्दलच उदासीनता !

चर्चासत्राचं दुसरं उपसत्र 'शिक्षणाचे मराठी माध्यम आणि परिभाषा' या विषयावर होतं. पुणे विद्यापीठाच्या विज्ञानशास्त्राचे सेवानिवृत्त विभागप्रमुख डॉ मो. वा. चिपळूणकर हे अध्यक्षस्थानी होते. या चर्चासत्रात डॉ. शेजवलकर, डॉ. ना. वा. कोगेकर, डॉ. स. य. पराजपे आणि श्री. वसंत पळशीकर यांच्या निबंधाचे वाचन झाले. प्रा. कोगेकरांनी आपल्या निबंधात शास्त्रशाखेकडे मराठी माध्यमाचा उपयोग करण्याच्या उपक्रमाच्या इष्टानिष्टतेची चर्चा केली. त्याच्या मताने महाविद्यालयातील पदवीपर्यंतचं शिक्षण मराठी माध्यमातून व्हायला काहीच हरकत नाही. पदव्युत्तर शिक्षणात आणि संशोधनक्षेत्रात मात्र मराठीचा आग्रह धरू नये. मात्र मराठी माध्यमाबद्दल आज उदासीनताच दिसते आहे. प्राध्यापक मराठीत शिकवायला नाखूष

आहेत विद्यार्थ्यांनी मराठी माध्यम स्वीकारल तर नोकरीची शाश्वती वाटत नाही. शास्त्रविषयावरची पुस्तकं ही हव्या त्या प्रमाणात निर्माण झालेली नाहीत. त्याबाबतीत मुख्य अडचण परिभाषेची आहे. परिभाषेच्या बाबतीत कृत्रिम तऱ्हेने शब्द तयार करू नयेत. ते शब्द संशोधनाच्या संदर्भात निर्माण झाले, मूळ संकल्पनाच्या व्यवहारातून निर्माण झाले तर त्यांना अर्थ येतो. सध्याच्या परिभाषाकोशाच्या संदर्भात प्रा. कोगेकरानी एक चांगली सूचना केली. शासनाने केवळ पारिभाषिक शब्दांच्या याद्या प्रकाशित करून थांबू नये तर या परिभाषाचे स्पष्टीकरण करणारे, विवरण देणारे संज्ञाकोशही प्रसिद्ध करावेत.

डॉ. प्र. चिं. शेजवलकरांनी वाणिज्य शाखेच्या संदर्भात या प्रश्नाची चर्चा केली. त्यांचा निबंध खूप अभ्यासपूर्ण व त्या क्षेत्रातील ठोस अनुभवावर आधारलेला वाटला. शिक्षणाचं माध्यम सर्व स्तरावर मराठीच असलं पाहिजे हे त्यांनी आपल्या निबंधात आग्रहाने प्रतिपादन केलं. परिभाषेच्या संदर्भात बोलताना ते म्हणाले, परिभाषा स्वाभाविक असली पाहिजे. डॉ. रघुवीरांच्या परिभाषेचा उपयोग करून लिहिलेली नागपूर विद्यापीठातील पाठ्यपुस्तकं टाकाऊ ठरली. मुख्य प्रश्न परिभाषेचा नसून ग्रंथाच्या वाचनीयतेचा आहे. त्यांनी आणखी एक सूचना केली. पदवीधर तरुणांना संभाषणकलेचं ज्ञानही नसतं. तेव्हा अभ्यासक्रमात— विशेषतः व्यापारशाखेच्या अभ्यासक्रमात संभाषणाचा अंतर्भाव केला जावा.

त्यानंतर डॉ. स. य. पराजपे यांनी 'मराठी एक शास्त्रभाषा' या विषयावर निबंध वाचला. मराठी अजून खऱ्या अर्थाने शास्त्रभाषा झालेली नाही, म्हणून त्यानी खंत व्यक्त केली. सर्वांना शास्त्राचे फायदे हवे आहेत. पण शास्त्रीय विचार निर्माण होण्याला अनुकूल वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी मात्र टाळली जात आहे. परिभाषेचा प्रश्न त्यामानाने गौण आहे. मुख्य म्हणजे शास्त्राबद्दल-प्रेम पाहिजे. डॉ. पराजप्यांचे विचार तळमळीचे असले तरी त्यांच्या निबंधाची भाषा फारच गोलमाल वाटली. एकाच मुद्द्याभोवती गोलगोल फिरणाऱ्या पसरट विधानांनो कोणती परिणामकारकता डॉ. परांजपे साधू पाहात होते, ते कळत नाही.

यानंतर चर्चासत्राला निबंध पाठवूनही उपस्थित नसलेल्या श्री. वसंतराव पळशीकराचा निबंध वाचून दाखवण्यात आला. या निबंधात त्यानी परिभाषा निर्मितीचे हे सगळे प्रयत्न म्हणजे प्रस्थापिताचा आपल्या हातात सत्ता ठेवण्याचा खटाटोप होय असा आरोप केला होता.

या निबंध वाचनानतर जी चर्चा झाली तिच्यात प्रामुख्याने डॉ. शेजवलकराच्या पीएच्. डी. च्या प्रबंधासाठी सुद्धा मराठी माध्यमच असावं या सूचनेवर उलटसुलट विचार मांडण्यात आले डॉ. शेजवलकर, डॉ. य. दि. फडके हे मराठी माध्यमाचा पुरस्कार करणारे नेते, तर डॉ. केळकरानी तसे करण्यातील व्यावहारिक अडचणी स्पष्ट केल्या. प्रबंधाचे परीक्षक मंडळही मराठी भाषिकच ठेवावं लागेल. त्यामुळे त्याचं यथार्थ मूल्यमापन होण्याची शक्यता कमी आहे असं त्यांना वाटलं. तर परकीय परीक्षक तेवढे यथार्थ मूल्यमापन करतात आणि स्वकीय करणार नाहीत हा स्वकीयांवरचा अविश्वास योग्य नाही असं इतराना वाटलं. यावर अध्यक्ष डॉ. चिपळूणकरानी हस्तक्षेप करून ही भरकटलेली चर्चा थांबवली. त्यानंतर डॉ. भीमराव कुलकर्ण्यांनी मराठी परिभाषा निर्माण करताना १९ व्या शतकातील परिभाषा निर्मितीच्या प्रयत्नाकडे दुर्लक्ष होऊ नये, अशी सूचना केली. प्रा. वसत दावतरांनी संशोधनक्षेत्रात मराठीचा वापर नको असे म्हणणाऱ्याच्या विधानाला आक्षेप घेतला. मराठीला उच्च विद्या आणि संशोधनक्षेत्र वर्ज्य केल्यावर त्या क्षेत्रातील मराठीची परिभाषा कधीच समृद्ध होणार नाही असं मत त्यांनी व्यक्त केलं. डॉ. इंदापूरकरानी जपान, चीन, रशिया इ. राष्ट्रांनी मातृभाषेचा उपयोग करूनच प्रगती केली हे निदर्शनास आणून मराठीच्या संदर्भात तिच्या क्षमतेविषयी संशय व्यक्त करू नये असं प्रतिपादन केलं.

## मूळ अनुभवाचाच अभाव

प्रा. श्रीनिवास दीक्षितांनी या संदर्भात एक चांगला मुद्दा मांडला. प्रत्येक भाषेला तिची स्वतःची इडियम असते. ती अनुभवातून तयार झालेली असते. मूळ अनुभवाचाच अभाव असल्यावर त्यावर आधारलेली इडियम भाषेत येणार कशी? वेळेवर जाणं हे आपल्या मनोवृत्तीत नाही. म्हणून त्या अर्थाची इडियम आपल्याकडे तयार नव्हती. खेडूतही त्यासाठी इंग्रजी पर्याय वापरताना दिसतात. (टायमावर आलो इ.) तेव्हा मूळ अनुभवाच्या दृष्टीने इंग्रजी शब्द जसेच्या तसे वापरायला हरकत नाही. परिभाषेची क्लिष्टता सापेक्ष असते हे सांगताना, डॉ. स. य. पराजप्यानी वैद्यकशास्त्रातील संकल्पनाचा उल्लेख केला त्याची परिभाषा इंग्रजीत असली काय आणि मराठीत असली काय सारखीच क्लिष्ट वाटणार, असं त्यानी सांगितलं. प्राचार्य गंभीर चर्चेत भाग घेताना म्हणाले की, आम्ही प्राध्यापक परिभाषा कठीण की सोपी याचा विचार करत नाही. आम्हाला एक निश्चित परिभाषा मात्र हवी असते. तिच्या बाबतीत संदिग्धता असू नये.

या उद्बोधक चर्चेनंतर चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ. मो. वा. चिपळूणकर यांनी चर्चासत्राचा समारोप केला. ते म्हणाले, 'आतापर्यंत झालेल्या चर्चेत एका विषयाची चर्चा झालीच नाही. मराठीत शास्त्रीय लेखन करताना ज्या अडचणी येतात त्या कोणीच विचारात घेतल्या नाहीत. इंग्रजी पुस्तकाचा मराठीत अनुवाद करायचा म्हटलं तरी वाक्यरचनेची अडचण जाणवते. इंग्रजी वाक्यात क्रियापद मधे असून विधेय शेवटी असते. त्यामुळे एकामागोमाग दुसरा अशी मुद्द्याची साखळी जोडली जाते. पण मराठीत विधेय मधे असून क्रियापद शेवटी येत. त्यामुळे विधान करून पुढच्या मुद्द्यासाठी पुन्हा मागे यावं लागतं. इंग्रजीचं एक वाक्य मराठीत स्पष्ट करायला तीन वाक्यं खर्ची घालावी लागतात. मराठीचं टंकलेखन करतानाही वेगावर खूप नियंत्रण पडतं. इंग्रजीच्या मानाने मराठीचा वेग तिपटीने कमी आहे. त्यामुळे मराठीतील वर्तमानपत्रातील सर्व मुद्रणपूर्व लेखन हातानीच कराव लागतं. ही फारच अडचणीची गोष्ट आहे. मराठीच्या लिंगव्यवस्थेमुळेही अडचणी येतात. इंग्रजीतील लिंगरहित पारिभाषिक संज्ञासाठी मराठीत लिंगनिश्चिती करावी लागते या अडचणीवर उपाय शोधला पाहिजे.

## लोकमाध्यमे व परिभाषा

तिसर आणि शेवटचं चर्चासत्र 'लोकमाध्यम आणि मराठी परिभाषा' या विषयावर होतं. महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनालयाचे संचालक श्री. य. शं. कानिटकर हे अध्यक्षस्थानी होते. या चर्चासत्रासाठी वृत्तपत्र, आकाशवाणी आणि दूरदर्शन या लोकमाध्यमांशी संबंधित असलेल्या अधिकारी व्यक्तींना पाचारण करण्यात आलं होतं. प्रथम दूरदर्शनच्या श्री. केशव केळकरांनी 'मराठी परिभाषा आणि दूरदर्शन' या विषयावर निबंध वाचला. त्यांनी दूरदर्शनवरील मराठी भाषेचं स्वरूप सांगताना सांगितलं की, बाहेरून निमंत्रित केलेल्या व्यक्तींच्या भाषेवर आम्ही नियंत्रण ठेवू शकत नाही पण दूरदर्शनच्या निवेदकाच्या भाषेत, दूरदर्शनवरील फलकाच्या भाषेत सुधारणा सुचवल्यास आम्ही त्याचा जरूर स्वीकार करू. पण काही गोष्टी अपरिहार्यपणे घडतात. दूरदर्शनच्या सेवेत जशी मराठी माणसं आहेत तशीच अन्यभाषिकही आहेत. त्याच्या सरमिसळीने दूरदर्शनच्या मराठीवरसुद्धा परिणाम होऊ शकतो. उदा० 'प्रेक्षक' ऐवजी 'दर्शक' शब्दाचा प्रयोग. 'नेत्रदीपक' हाही शब्द चुकीच्या अर्थानेच रूढ झाला आहे. पण याउलट मराठीनेही अन्य भाषिकांना काही शब्द दिले आहेत. युवदर्शन, युववाणी, साप्ताहिकी इ.

त्यांच्यानंतर पुणे आकाशवाणी केंद्रातील श्री. वसंतराव कुलकर्णी यांनी आपले विचार मांडले. त्यांचाही सूर असाच अनाग्रही दिसला. ते म्हणाले आमचा मुख्य उद्देश आशय श्रोत्यापर्यंत पोहोचवण्याचा आहे. मग तो कोणत्या का परिभाषेत जाईना. वक्त्यांपैकी कुणी अंदाजपत्रक म्हणेल, कुणी अर्थसंकल्प म्हणेल, त्याला मी आक्षेप घेणार नाही. आकाशवाणीच्या परिभाषेत अजूनही खूप गोधळ आहे, हे मान्य करून ते म्हणाले उपयुक्त सूचना स्वीकारण्याची आमची सदैव तयारी आहे. (एक विशेष जाणवला तो असा की, श्री. य. शं. कानिटकर, श्री. केशव केळकर, श्री. वसंतराव कुलकर्णी ही सर्व शासकीय सेवेतली मंडळी पण स्वत.वरच्या टीकेच्या संदर्भात प्रांजळ दिसली आणि अनाग्रही वाटली.)

यानंतर श्री. ल. ना. गोखले यांनी वृत्तपत्रीय परिभाषेवरचा आपला निबंध वाचला. वृत्तपत्रांनी मराठी परिभाषा बरीच समृद्ध केली असली तरी वृत्तपत्रे मात्र परिभाषेसंबंधी फारशी जागरूक आहेत असे दिसत नाही, असं सांगून ते म्हणाले की, वृत्तपत्रीय परिभाषा अजूनही निश्चित नाही. पाश्चात्त्य देशात प्रत्येक वृत्तपत्र स्वत.चं 'स्टाइल बुक' तयार ठेवतं. तसं करणं मराठीच्या वृत्तपत्रांना आवश्यक वाटत नाही. बहुतेक वेळा इंग्रजी शब्दावरच निर्वाह केला जातो. व्यंगचित्रे, पत्रकारपरिषद इ. चुकीचे शब्द सर्रास वापरले जातात. मराठीची प्रकृती विचारात न घेता इंग्रजी शब्दासाठी शब्दकोशातले पर्याय स्वीकारल्यामुळे कसे घोटाळे होतात हे त्यांनी सोदाहरण स्पष्ट केले.

लोकमाध्यमासंबंधी असे हे दोनच निबंध होते. त्यानंतर प्रा. स. शि. भावे यांनी निबंध वाचला निबंध वेगळया धाटणीचा होता. त्या निबंधात त्यांनी मराठी प्राध्यापकांच्या अध्यापनातील आणि लेखनातील कृत्रिम सवंग शैलीचा खरपूस समाचार घेतला. विनाकारणच अर्थहीन गुळगुळीत अशी भाषा वापरून काहीच साध्य होत नसते, तरी प्राध्यापकांना तशी भाषा वापरण्याचा मोह आवरत नाही.

सकाळच्या सत्रात श्री. वसंतराव पळशीकर अनुपस्थित असतानाही त्यांचा निबंध वाचला गेला होता. तसाच प्रघात श्री. अनंतराव कुलकर्णी यांच्या निबंधाच्या बाबतीत का पाळला नाही, हे समजले नाही. श्री. अनंतराव कुलकर्णी यांचा निबंधही महत्त्वाचा होता. मराठी माध्यमातून शास्त्र विषयाची पुस्तके निर्माण करण्याच्या बाबतीत उद्‌भवलेल्या समस्यांचा त्यांनी अगदी नेटक्या शब्दात ऊहापोह केला होता.

नंतरची चर्चा फारशी महत्त्वाची वाटली नाही. डॉ. गिडवानी यांनी आकाशवाणीच्या सिंधी कार्यक्रमाची एक गंमत सांगितली. मुस्लिम देशासाठी करावयाच्या प्रसारणात फारशी–उर्दू शब्दांचा भरणा असतो तर भारतीयासाठी करावयाच्या प्रसारणात हिंदी–संस्कृत शब्दांचा भरणा असतो. हे फार कृत्रिम आहे असे त्यांनी सांगितले. आकाशवाणीवर सुरू असलेल्या संस्कृत वार्तापत्राबाबतही ते तयार करणारे लोक हिंदी परिभाषेवर अवलंबून असतात ही त्यांनी दिलेली माहिती संस्कृतच्या वर्चस्वाविरुद्ध ओरड करणाऱ्यांना निश्चितच दिलासा देणारी वाटली असली पाहिजे. डॉ. केळकरांनी सांगितलं की, दोन भाषा एकच आल्या की त्यांच्यात देवाण-घेवाण होणारच. मराठीत इतर भाषातील शब्द घुसले तसे मराठीचे शब्दही इतर भाषांत घुसले आहेत. त्यांनी या संदर्भात मराठीच्या 'संस्कृती' या शब्दाचा बंगालीत झालेल्या संक्रमणाचा इतिहास सांगितला. ब्राह्मणाची भाषा शुद्ध आणि इतरेजनांची अशुद्ध हा समज खरा नाही. उलटही प्रकार असू शकतो हे त्यांनी उदाहरणांनी स्पष्ट केले.

समारोपादाखल बोलताना श्री. कानिटकर म्हणाले की, मराठी निवेदक परकीय विशेष नामाचा शुद्ध उच्चार करण्याची खूप काळजी घेतात पण अन्य भाषिक मात्र मराठी विशेषनामांची एवढी काळजी घेताना दिसत नाहीत. हिंदीच्या संपर्काने मराठीचे भाषाप्रदूषण बऱ्याच प्रमाणात झालं आहे. या दोन्ही प्रवृत्ती टाळल्या पाहिजेत.

## आधुनिक संकेत : परिभाषा

यानंतर या चर्चासत्राच्या समारोपाचा कार्यक्रम झाला. सुरुवातीला प्राचार्य गंभीरांनी या चर्चासत्राची सर्व पार्श्वभूमी स्पष्ट केली. त्यानंतर या समारंभाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी बोलायला उभे राहिले. ते म्हणाले की, प्राचीन भारतीय शास्त्रामध्ये भाषेसंबंधी दोन वाद आहेत. शब्द आणि अर्थ यांचा संबंध स्वाभाविक की सांकेतिक यासंबंधी आपली भूमिका मांडताना मीमांसक सांगतात की वैदिक शब्द हा स्वाभाविक ईश्वरकृत समजावा. पण त्यानंतर निर्माण झालेले शब्दसंकेत हे सर्व मानवकृत आहेत. त्यांनाच परिभाषा म्हणतात. 'आधुनिक: संकेत: परिभाषा' पाणिनी हा सर्वात पहिला परिभाषाकार होय. त्याने ५००० नवीन संकेतांना जन्म दिला. नवीन ज्ञान नेहमी अपरिचित असते. त्यामुळे तद्‌वाचक शब्दही अपरिचितच असणार. म्हणून तो कठीणच वाटणार. तो शिकावाच लागतो. वसंत पळशीकर म्हणतात तसा आपल्या हातात सत्तास्थानं ठेवण्यासाठी कोणी कठीण परिभाषा मुद्दामहून करत नसतं. शास्त्रज्ञ

चिंतन करतो. त्याला नवीन ज्ञान स्फुरतं. ते तो शब्दबद्ध करतो. ते प्रथम थोडयाफार लोकांनाच कळतं; पण त्याचा उपयोग नंतर सर्व मानवजातीच्या कल्याणासाठी होतो. केवळ वसंत पळशीकराप्रमाणे बहुजनसमाजाविषयी मार्क्सवादी कनवाळूपणाची भाषा वापरल्याने बहुजन समाजाचं कल्याण होत नाही.' तर्कतीर्थांचं भाषण हे नेहमीप्रमाणेच अतिशय विद्वत्तापूर्ण, विचारपरिप्लुत आणि वक्तृत्वपूर्ण असंच झालं. शेवटी प्रा. द दि. पुंडे यांनी आभार मानले.

चर्चासत्राची व्यवस्था ही मुद्दाम नमूद करण्यासारखा विषय आहे. प्रा. पुंडे आणि प्रा. वि. भा. देशपांडे यानी चर्चासत्राची सर्व जुळवाजुळव अतिशय साक्षेपाने केली होती. प्राचार्य गंभीराच्या सदिच्छा त्यांच्यामागे होत्या. इतर प्राध्यापकाचं सहकार्यही उत्तम होतं. सर्व गोष्टी नियोजित वेळेला आणि शिस्तशीरपणे केल्या जात होत्या. इतकं असूनही कुठेही तक्रार, आरडाओरड जाणवली नाही. वर्गातील फलक लेखनापासून, बसण्याच्या व्यवस्थेपर्यंत सर्व काही सुखद होतं. एक आदर्श चर्चासूत्राचं आयोजन केल्याबद्दल चर्चासत्रातील निमंत्रितांच्या वतीने डॉ. शेजवलकरानी प्राचार्य गंभीर आणि त्याचे सहकारी यांना जे धन्यवाद दिले ते उचितच होते, यात संशय नाही.

या शेवटच्या सभेत प्राचार्य गंभीरांनी या चर्चासत्रात संमत झालेले पुढील ठराव वाचून दाखविले.

१. परिभाषासमित्यांवर त्या त्या विषयातील तज्ज्ञाखेरीज भाषाशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ यानाही घेण्यात यावे.

२. विद्यापीठीय शिक्षणात पीएच्. डी.च्या स्तरापर्यंत मराठीचा वापर करण्याची मुभा असावी.

३. निरनिराळया विषयातील परिभाषाचे स्पष्टीकरण करणारे सुलभ कोश तयार करण्यात यावेत.

४. पुस्तक प्रकाशित करण्यापूर्वी पाश्चात्य देशातल्याप्रमाणे प्रकाशकांनी अगोदर मर्यादित प्रती काढून तज्ज्ञाकडून त्यावर अभिप्राय मागवून घ्यावेत व नंतरच पक्की प्रत प्रकाशित करावी.

५. पदवी परीक्षेच्या अभ्यासक्रमात केवळ लेखी स्वरूपाच्या परीक्षेवर भिस्त ठेवू नये. संभाषण कौशल्याचाही या अभ्यासक्रमात समावेश असायला पाहिजे. □

रंगभूमी । सदानंद बोरसे

# मुक्काम वाई

वाई तसं फार छोटं नाही पण फार मोठं तर नाहीच नाही असं तालुक्याचं गाव. तिथलं कृष्णेकाठचं साठे मंगल कार्यालय. शुक्रवार दि. ७ डिसेंबर नऊची वेळ. साठे कार्यालय गजबजलेलं. कुणाच्या लग्नासाठी हा आडवेळचा मुहूर्त? लग्न नाही; पण हेही कार्यच होत. आणि कोणाच्याही घरचं नसूनही सगळयाच्याच घरचं होतं. 'प्रतिक थिएटर्स' तर्फे दरवर्षी भरविण्यात येणाऱ्या एकांकिका स्पर्धांचा तो पहिला दिवस होता.

वाईतील नाटयप्रेमी तरुणांची 'प्रतिक थिएटर्स' ही संस्था, वाईसारख्या वीतभर गावातही या लोकांची धडपड पाहिली, वर्षभरात ते करीत असलेले नाटकांचे व एकांकिकाचे प्रयोग पाहिले की अक्षरशः थक्क व्हायला होते. महाराष्ट्र राज्य नाटयस्पर्धेत आणि इतर स्पर्धांमधूनही दरवर्षी 'प्रतीक थिएटर्स' पारितोषिके खेचून आणतेच; पण त्याचबरोबर १९७५ पासून खुद्द वाईमध्ये 'प्रतिक' तर्फे एक एकांकिका स्पर्धा भरविण्यात येते. तालुक्याच्या ठिकाणी एकांकिका स्पर्धा आयोजित करणारी संपूर्ण महाराष्ट्रातील 'प्रतिक' ही पहिली संस्था. गेल्या पाच वर्षांमधील 'प्रतिक'च्या या स्पर्धांना मिळणारा वाढता प्रतिसाद पहिला; तर नाटकाची चळवळ हळूहळू शहरापासून दूरही अतिशय जोमाने मूळ धरू लागली आहे, याचे प्रत्यंतर येते.

अतिशय स्वयंभू व स्वतंत्र संच हे 'प्रतिक'चे आणखी एक वैशिष्टय. केवळ नाटकात अभिनय करणारा नटवर्ग वा या नटवर्गाला बोटाच्या तालावर हलविणारा दिग्ददर्शकच फक्त 'प्रतिक'मध्ये तयार होत नाही; तर 'प्रतिक'च्या प्रयोगांचे पडदे संस्थेतीलच एखादा यशवंत ओतारी रंगवतो, नेपथ्यापासून रंगभूषेपर्यंत. इतकेच काय मंडप उभारणे, टेबल–खुर्च्या हलविणे इत्यादी कामेसुद्धा 'प्रतिक'चेच सभासद एकदिलाने व मनापासून करतात. एकांकिका स्पर्धांच्या संयोजनाच्या बाबतीतही तेच. पार लाकडी स्टेज उभारण्यापासून ते स्पर्धेच्या निमित्ताने काढलेल्या स्मरणिकेसाठी जाहिराती मिळविण्यापर्यंत प्रत्येक कामात प्रत्येकाचा हातभार लागलेला असतो.

हौशी कलाकार आणि नाटयप्रेक्षक यांचे नाटयवेड जपणे व जोपासणे आणि हौशी कलाकारांना आपले कलागुण दाखविण्याची संधी उपलब्ध करून देणे यासाठी 'प्रतिक' सतत प्रयत्नशील असते. असाच एक प्रयत्न म्हणजे एकांकिका स्पर्धा.

यावर्षी दि. ७ ते ११ डिसेंबर अशा पाच दिवस चाललेल्या या स्पर्धांमध्ये एकूण पंचवीस स्पर्धक संघांनी भाग घेतला होता. विशेष म्हणजे या पंचवीस संघांनी एकाही एकांकिकेचे दोन प्रयोग न करता पंचवीस वेगवेगळया एकांकिका सादर केल्या. ॲक्टिव्ह् थिएटर्सच्या 'सिग्नल'ला साधिक प्रथम पारितोषिक मिळाले. भरत नाटय मंदिरच्या 'रक्तपुष्प'ला दुसरे बक्षीस मिळाले; तर गरवारे कॉमर्स कॉलेजच्या 'सद्दू आणि दाद्दू'ला तिसरे पारितोषिक मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचे बक्षीस श्री. मधुकर टोमके (त्रस्ट भूमिका-ब्राऊन) आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे बक्षीस स्मिता ओक (रक्तपुष्प भूमिका–पद्मा) याना मिळाले. याशिवाय अविनाश देशमुख, माधव आफळे, उदय रास्ते, अजित वनारसे इत्यादीना अभिनयाची बक्षिसे मिळाली. दिग्दर्शनाचे पहिले बक्षीस श्री. रघुनाथ माटे (रक्तपुष्प) व दुसरे बक्षीस श्री. शाम जोशी (उःशाप) यांना मिळाले. स्पर्धेसाठी सर्वश्री अजित सातभाई, मुकुंद चितळे आणि शंकर पाटील यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

या स्पर्धेचा दर्जा हा पुण्या-मुंबईला होणाऱ्या कोणत्याही स्पर्धेइतकाच समाधानकारक होता. शहरात एखाद्या सुसज्ज नाटयगृहात होणाऱ्या प्रयोगाला लाभणाऱ्या सोयी व तांत्रिक सुविधा या स्पर्धेमध्ये पूर्णांशाने न मिळाल्याने कलाकाराच्या नैसर्गिक आविष्काराचा व सामर्थ्याचा एक प्रकारे कसच लागणार होता; पण बऱ्याच एकांकिका त्यात तांत्रिक अंगाचा वापर भरमसाट केल्याने कोसळल्या, बऱ्याच

कांकिका आंधळ्या अनुकरणामुळे पडल्या, तर काही एकांकिका श्रम व तयारी कमी पडल्यामुळे नीट वठल्या नाहीत. अर्थात हे दोष नसलेल्या आणि अतिशय सफाईदार प्रयोग झालेल्या एकांकिकाही खूप होत्या. थोडक्यात गुणदोषासकट आणि त्याच्या प्रमाणासकट कुठेच ही स्पर्धाही इतर स्पर्धांपेक्षा कमी पडली नाही

स्पर्धांना मुख्यत: प्रेक्षक उपस्थित होता, तो कॉलेजचा तरुण वर्ग. त्यांच्याकडून येणाऱ्या कॉमेंट्सही आपल्या पुरुषोत्तम करंडकच्या तोडीस तोड होत्या. पण या स्पर्धेत 'बालादपि सुभाषितं ग्राह्यम्।'ची जाणीव करून देणारी काही नखाएवढी पोरेही होती. त्यांच्याकडूनही काही वेळेस अजाण व अभावित पण भलतीच खट व फिट मल्लीनाथी होत होती. (उदाहरणार्थ– एका एकांकिकेत 'भारत माझा देश आहे' सुरू झाल्यावरोबर एक चिमुरडी मोठ्यांदा 'ए आईय, हे बघ माझ्या मराठीच्या पुस्तकातलं म्हणतायेत.) असे म्हणाली.

सतीश खरे, सतीश शेंडे, बंडू गोरे, प्रदीप पाटणकर, संजय मेहेंदळे, विलास पाटणे, प्रदीप जंगम, उल्हास गांधी, सुनीती जोशी, ममता पंडित इत्यादी 'प्रतीक'च्या कार्यकर्त्यांनी स्पर्धांचे संयोजन चोख ठेवले होते.

या स्पर्धेच्या प्रसंगी फक्त 'प्रतीक' कडूनच नव्हे तर बहुतेक स्पर्धकाकडून ऐकू आलेली सार्वत्रिक तक्रार–लेखकाच्या मानधनाबद्दल. अक्षरश: वर्गणी काढून नाटकाचा संपूर्ण खर्च भागवणाऱ्या या हौशी संस्थांना एकांकिकेसाठी असलेले लेखकाचे भरमसाट मानधन देणे ( पन्नास ते शंभर रुपयांच्या आसपास ) चांगलेच जड जाते.

तर अकरा डिसेंबरला या स्पर्धा संपताच लगेच बारा डिसेंबरपासून 'प्रतीक'ची मंडळी दुसऱ्या एका स्पर्धेसाठी स्वत:ची एकांकिका बसविण्याच्या मागेही लागली. ही हौस, हा उत्साह केवळ थक्क करणारा, मानायला लावणारा. □

## वऱ्हाड चाललंय लंडनला....

### अफलातून एकपात्री प्रयोग

तीस नोव्हेंबरची संध्याकाळ. मुंबईच्या विल्सन कॉलेजमध्ये इंडियन नॅशनल थिएटर एका मराठवाडी कलावंताचा एकपात्री प्रयोग सादर करणार असा फलक लागलाय्. प्रयोगाचं नाव 'वऱ्हाड चाललंय लंडनला.' कलाकार होते औरंगाबादचे प्रा. लक्ष्मणराव देशपांडे.

संध्याकाळी सव्वा सहाच्या दरम्यान लक्ष्मणराव हॉलमध्ये येतात. प्रा. कमलाकर सोनटक्के हे लक्ष्मणरावाचे गुरू. त्याचे वाकून आशीर्वाद घेतात. वऱ्हाडी मंडळीशी पाच एक मिनिटं हितगुज नि लक्ष्मणराव रंगपटात अदृश्य होतात. प्रेक्षकामध्ये गुरुवर्य वा. ल. कुलकर्णी दिसताहेत.

साडेसहाला कमलाकर सोनटक्के प्रास्ताविक करतात. नाट्यकलेत पदवी घेतलेल्या प्रा लक्ष्मणराव देशपांड्याची प्रेक्षकांशी ओळख होते. पडदा वर जातो. आणि लक्ष्मणराव अवतरतात.

त्यानंतर सव्वा दोन तास हास्याचे तुफान धबधबे नि प्रेक्षकांची दाद हॉल दणाणून टाकतात.

मराठवाड्यातला एका सधन शेतकऱ्याचा मुलगा तुफान हुशार आहे, खेडं, तालुका, शहर नि मुंबईला जाम फस्कलास शिक्षान घेऊन तो लंडनला प्रयाण करतो. तिथे त्याची ओळख एका इंग्लिश मुलीशी होते आणि तो तिच्याशी लग्न करायचं ठरवतो.

हा मुलगा घरी येतो आणि एका दिवशी वडिलाना–बाप्पाना–ही बातमी सांगतो. आश्चीताची बातमी ऐकून बाप्पा अगोदर संतापतात नंतर अगतिक होतात नि शेवटी एकुलत्या एका पोराच्या आग्रहापुढे नमतात. मात्र दोन अटी ते पोराला–दादाला–घालतात एक म्हणजे पोरीच्या बापानं इथे येऊन लग्नाची बोलणी करावीत. त्यात दादानं बिलकुल बोलता कामा नये आणि लग्न लंडनलाच होईल आणि आपल्या मराठवाडी पद्धतीनं होईल.

बबन्या हा बाप्पांचा नॉन मॅट्रिक पास असिस्टन्, बाप्पा बबन्याला पोरीच्या बापाला जॉनरावाला पत्र लिहायला सांगतो. त्याप्रमाणे जॉन मराठवाड्यात येतो. बैठक होते. गावात वऱ्हाड लंडनला जायची गडबड सुरू होते. वऱ्हाड लंडनला जातं. तिथं दादाचं लग्न होतं.

प्रा. लक्ष्मणराव देशपांडे यानी एकपात्री प्रयोगाला सुरेख सजवून प्रेक्षकासमोर मांडलं. त्यांच्या वऱ्हाड चाललंय् लंडनला 'चा हा सदुसष्टावा प्रयोग. या मराठवाडी गावातली दादाच्या लग्नाची खळवळ नि त्याचा गावातल्या प्रत्येक माणसावर होणारा अनिवार्य परिणाम, जॉन गावात येतो तेव्हाची धादल गडबड नि नंतरची अफलातून बोलण्यासाठीची बैठक, त्यात दादाची आजी पोटझाकणीच्या दोन पातळाची मागणी पुढे ठेवते तेव्हा नॉन मॅट्रिक पास बबन्याची या मागणीचं जॉनसाठी भाषांतर करताना होणारी अडचण लक्ष्मणरावानी हुबेहूब दाखवली. या प्रयोगातली एकूण जवळपास विसेक पात्रं, त्यांच्या लकबी, त्यांची ढब ह्याचं प्रस्तुतीकरण इतकं जबरदस्त होतं की लक्ष्मणरावांच्या या अमाप प्रयोगाचं यश आता जवळ जवळ निश्चितच झालं आहे.

मजल दरमजल करून वऱ्हाड लंडनच्या विमानतळावर पोचतं. सगळ्यांचं जॉन स्वागत करतो आणि जॉनची कन्यका आणि दादा एकमेकांच्या–बाहुपाशात बद्ध होतात. लक्ष्मणरावानी हा प्रसग आणि त्याची इतरांवरली प्रतिक्रिया जशी दाखवली ते त्याचं कर्तृत्व प्रेक्षकाच्या दीर्घकाळ लक्षात राहील एवढं निश्चित. थेट दादाच्या आजीपासून तो गावातले म्हातारे गुरुजी नि विमानतळावरली उद्घोषिका हे सारे स्वर लक्ष्मणरावांनी अचूक पकडले.

थेट मराठवाड्यातल्या खेड्यापासून पंचतारांकित हॉटेलापर्यंत सर्व ठिकाणी 'वऱ्हाड चाललंय् लंडनाला' चे प्रयोग झाले आहेत नि त्याची भरघोस पावती लक्ष्मणरावाना लाभली आहे.

लक्ष्मणराव तसे फार गप्पिष्ट. एकदा त्यांच्याशी रात्रभर गप्पा मारण्याचा योग आला होता. त्यानंतर एकदम वऱ्हाडी म्हणून मी त्यांच्या प्रयोगात सामील झालो. या गप्पांमधूनच 'वऱ्हाड' बहरलंय्.

प्रा. लक्ष्मणराव देशपांडे यांनी ठिकठिकाणचे वऱ्हाडी लंडनला देण्यासाठी उदंड जमा करावेत. आणि त्यांच्या कलेला प्रसंगी थेट लंडनलाच जायची सुसंधी प्राप्त करून द्यावी अशी साऱ्याच वऱ्हाडी मंडळीना आस लागून राहिलीय्.

शुभास्ते पंथान: सन्तु।

श्याम तारे

## विचारवंत-साहित्यिक

पृष्ठ ४ वरून

तुम्हाला हव ते करणार नाही. या सभामधून मी एक स्वत.च रचलेली कविता म्हणून दाखवत असे. ती कविता अशी–

का गोळा झाले आहेत
हे काळेकुट्ट मेघ
जे गर्जतही नाहीत
पडतही नाहीत
आकाश तर सगळं यांनी
टाकलं आहे झाकोळून
कुणीकडूनही
एकुटी क्षीण रेखादेखील प्रकाशाची
खालते उतरू पावत नाही
कवीनं म्हटलं होतं–
–रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष काल
केवळ त्या भरवशावरच
काळ हा काळोखभरला कसाबसा
कठायचा ठरवी तसं
मुक्त श्वसन करण्याजोगं
काही उरलं नाही !

'इंदिराजींनी निवडणुका जाहीर केल्या आणि मी जनता पक्षाच्या प्रचाराला हिंडायला लागलो. नागपूर, अमरावती, विदर्भ-मराठवाड्यात प्रचाराच्या सभा घेतल्या. प्रबल पाशवी सत्तेविरुद्ध लढण्याचे आवाहन केलं.

'आजही तीच सत्ता वेगळ्या स्वरूपात उभी ठाकली आहे. म्हणूनच लोकांना पुन्हा जागं करण्याची गरज आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने लोकअभियान मंचाची स्थापना केली आहे. आज प्रत्येक अंगाचे सामाजिक जागरण हवंय. त्यासाठी निर्माण झालेलं हे धर्मचक्र आहे. मी या मंचाच्या सागली-मिरजच्या सभांमध्ये बोललो. तिथे मी लोकांना सांगितलं की मतदान केलं तर पुण्य नाही, पण न केलं तर मात्र पाप ! मी तुम्हाला 'काय करा ' ते सांगत नाही, पण 'काय करू नका ' ते सागतो. तुम्ही काय वाटेल ते करा पण हाताला मत देऊ नका. हा हात गळ्याभोवती फास आवळेल. मी असं म्हटलं की टाळ्याचा कडकडाट व्हायचा.

'मी स्वत: आज निराश झालेलो नाही. जनता पक्षातला कचरा आता गळून गेला आहे, या पक्षाने इतरही खूप चागलं काम केलं आहे. जगजीवनबाबू पंतप्रधान झाल्याने गाधीजींचं स्वप्न पूर्ण होणार आहे. आपण जनता पक्षालाच मत दिल पाहिजे. नानासाहेब गोरे हा शुद्ध मोत्यासारखा माणूस आहे त्याच्यासारख्या उमेदवारासाठी मी जेवढा वेळ मिळेल तेवढा खर्च करायला तयार आहे.

## जनतेचा सवाल

जनता सरकार कोसळलं आणि दुर्गाबाईंचा संताप अनावर झाला. या संतापाला पहिली मोकळी वाट करून दिली युवा संघर्ष वाहिनीच्या युवक–युवतीनी १९ जुलै १९७९ ला मुबईच्या चर्चगेट स्टेशनवरच्या गर्दीत दुर्गाबाईचं भाषण झालं. संयोजकानी आणलेला माईक बिघडलेला होता. काय बोलावं, कसं बोलाव, आपलं भाषण कुणाला ऐकू तरी जाईल का या काळजीत स्वत: दुर्गाबाईही होत्या; पण खुर्चीवर उभे राहून त्या तसंच माईकविना बोलू लागल्या. श्रोतृवर्गात सर्व तऱ्हेचे लोक होते. भाषण लिहिलेलं नव्हतं; पण उत्स्फूर्त होतं. 'लोकांचीही त्याला उत्स्फूर्त साथ मिळाली. आपल्या भाषणात दुर्गाबाई म्हणाल्या–

'माझ्या मित्रांनो, बंधूनो, भगिनीनो,

आज मला जे बोलायचं आहे ते मी तुमच्यासमोर नको तर कुणापुढे बोलू ? आज सर्वत्र उदासीनता भरली आहे. ज्या जनता पक्षातल्या काही नेत्याना आम्ही प्रेमभराने, आदराने नि विश्वासाने निवडून दिलं त्यांनीच आमचा विश्वासघात केला आहे म्हणून आपणा सर्वांना दु:ख झालं आहे, रागही आला आहे. तो झाकून ठेवायचं कारणच काय ? हे पक्षबदलू देशद्रोही आहेत. जनतेला आश्वासनं दिली ती न पाळता यांनी पक्ष बुडवला. राज्य बुडवलं. हाती दिलेला मंगलकलश फेकून दिला. यानी हे कृत्य अधारात केलं. जनतेला थागपत्ता लागू दिला नाही. वेश्यादेखील या फुटीरापेक्षा अधिक चागल्या, प्रामाणिक नि कर्तव्यनिष्ठ असतात.

'हे कसले नेते? जॉर्ज, मधू लिमये, मृणाल गोरे स्वत.ला समजतात तरी कोण ? लोकाना उत्तर देण्याची जबाबदारी यांची नाही ? मी कुठल्याही राजकीय पक्षाची नाही. इतरांप्रमाणे मलाही चागलं स्वच्छ कारभार असणारं सरकार हवं आहे; पण तेच मुळी अस्तित्वात नाही. मोरारजी देसाई पंतप्रधान झाले त्यावेळी पंधरवड्यातच मी त्यांना पत्र लिहिलं की कांतीला दूर ठेवा. त्यांनी उत्तरही पाठवलं नाही; पण मी माझं कर्तव्य केलं. तोटा झाला तो मोरारजीचा, माझा नव्हे.

'आम्ही इंदिरा गाधीशी झगडा केला. त्याचं कारण आमचं त्याच्याशी वैयक्तिक वैर होतं म्हणून नव्हे. इंदिरा गाधीनी आणीबाणी आणून सर्व देशाचाच तुरुंग केला होता. त्यामुळे लोक सतप्त झाले होते. या एकाच मुद्यावर जनता पक्षाने निवडणुकीत प्रचंड यश मिळवलं. राज्य स्थापन केलं. अठ्ठावीस महिन्याचं हे राज्य खरोखरच वाईट नव्हतं. काही कारण नसताना या फुटिरानी खुसपट काढली. राईचा पर्वत केला आणि महत्प्रयासाने मिळालेली सत्ता हातची घालवून जगात आपलं हसू करून घेतलं.

'मृणाल ही मला मुलीसारखी वाटायची. माझी फार आवडती. जेव्हा जॉर्ज फर्नांडिस यांना फुटीरपणात तिने साथ दिल्याचं मी

ऐकलं तेव्हा मस्तकावर वीज कोसळल्यागत झालं. डोळ्यातून पाणी वाहू लागलं. माझे वडील वारले तेव्हाही एवढं दुःख झालं नाही.

चरणसिंग वगैरेवर आमचा विश्वास नाही. कुणाचाही असूच नये, या लोकाना तुच्छ लेखणाऱ्या, पक्षबदलू फुटीराना, लोकहो क्षमा करू नका. त्याना चागला धडा शिकवा. काही झाले तरी जनता पक्ष टिकवा. पक्षातले काहीजण बिघडले म्हणून पक्षावर राग धरू नका. आपलं मूल बिघडलं तर त्याला आपण सुधारतो. मारून टाकीत नाही. तीच शिकवण इथे वापरायला हवी.

काळ तर मोठा कठीण आहे. पण खचून जाऊन चालणार नाही. जगाला आपण दाखवून देऊ या की राज्यकर्ते नालायक ठरले तरी जनता शहाणी आहे. तिला आपलं कर्तव्य कळतं.

---

सध्या उत्तर मुंबईमधून निवडणूक लढवीत असलेल्या मृणाल गोरे यांना दुर्गाबाई स्वतःच्या मुलीसारख्या मानत. १९७७ सालच्या निवडणुकीत गोरे निवडून याव्यात म्हणून दुर्गाबाईंनी रान उठवलं. परंतु त्याच गोरे जनता पक्षाच्या विघटनात सहभागी झाल्यावर दुर्गाबाई अस्वस्थ झाल्या. मृणालच्या किल्ल्याचा बुरुज न् बुरुज फोडून काढण्याचा त्यानी निश्चय केला. तत्पूर्वी मृणाल गोरे यानी जनतापक्षाचा त्याग केल्याबरोबर दुर्गाबाईंनी त्याना एक पत्र लिहिलं. ते पत्र पुढीलप्रमाणे—

प्रिय मृणाल,

जॉर्ज व मधू लिमये याच्या बरोबर तू जनता पक्ष सोडून आपल्या पूर्वीच्या समाजवादी गटात गेलीस व तुम्ही तुमचा तो स्वतंत्र पक्ष मानता हे ऐकून फार वाईट वाटलं. 'आपण करतो आहोत ते चूक आहे, तरीही मधू वगैरे एकटे पडू नयेत', असे उद्गार तू काढल्याचेही कानावर आले. जॉर्जनीही आपली चूक झाल्याचे मधू दंडवत्यांजवळ सागितलं असं वाचलं. तरी पवित्रा बदलला नाही. तुझी कृती व जातीयवाद्याची स्वजनाना व धर्माला चिकटून राहण्याची कृती या दोन्ही सारख्याच आहेत. तू एक अजोड, कर्तृत्ववान स्त्री आहेस. पण तू स्वतंत्र विचार करायला असमर्थ आहेस, असे तुझ्या जॉर्ज व मधू यांच्या मागून जाण्यामुळे वाटतं. कॉंग्रेसबरोबर तुम्ही समझोता करताहात. इंदिरेला दंड करण्याचं बाजूलाच राहलं पण तिला घाबरून आणीबाणीत गप्प बसलेल्या 'शूर' यशवंतरावाबरोबर आता तुमच्या सारख्यानी बोलणी करून फिरून कॉंग्रेसी राज्य आणण्यास सिद्ध व्हावं ही कल्पनाही घृणास्पद आहे.

मृणाल, सावध हो. वेळ गेली नाही तोवर या युतीतून बाहेर पड जनता म्हणजे लोक फार खवळले आहे तेव्हा लोकशाही पायाखाली तुडविणाऱ्याशी आणीबाणीतप्त अग्रणींनी तरी हातमिळवणी करू नये हीच इच्छा आहे. तू ऐकणार नाहीस हे माहीत आहे. पण सागणं हे आम्हा सामान्याचं कर्तव्य आहे. तेवढंच करते.

तुझी

**दुर्गा भागवत**

जव्हेरी व्हिला, गिल्डर लेन,
मुंबई ४०० ००८

(वरदा बुक्सतर्फे प्रकाशित झालेल्या पुस्तकातून साभार उद्धृत)

---


मान्यता पावलेला चरित्रग्रंथ

# टॉलस्टॉय – एक माणूस

दुसरी आवृत्ती । लेखिका : सुमती देवस्थळे । मूल्य : पंचावन्न रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०